रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक ९ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
www.krushival.in

## जरांगेंचा फडणवीसांवर भरोसा नाही

**मुंबई :** राज्याचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोन आला होता. त्यांनी एसआयटी चौकशी रद्द करण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, खरंच तसे होईल का? की त्यांनी केवळ शेंगा हाणल्या, हे लवकरच कळेल, अशा शब्दांत मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे यांनी फडणवीसांच्या कार्यपद्धतीवर संशय व्यक्त केला. शुक्रवारी (दि.१४) ते पत्रकार परिषदेत बोलत होते. आता पुढील एक महिन्याच्या आत आरक्षण मिळाले नाही. तर संपूर्ण समाज रस्त्यावर उतरेल व विधानसभा निवडणूकदेखील लढवणार, असेही ते म्हणाले.

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. १५ जून २०२४

किंमत ४ ₹

## विमान दुर्घटनाग्रस्तांना आदरांजली

**नवी दिल्ली :** कुवेतमधील अग्नितांडवात मरण पावलेल्या ३१ भारतीय नागरिकांचे पार्थिव शुक्रवारी (दि. १४) हवाई दलाच्या विशेष विमानातून मायदेशी आणण्यात आले. मृतांमध्ये २३ मल्याळी नागरिकांचा समावेश आहे. केरळचे मुख्यमंत्री पी. विजयन आणि राज्यमंत्र्यांनी विमानतळावरच आदरांजली वाहिली. दोन दिवसांपूर्वी झालेल्या येथील दुर्घटनेत ४५ भारतीयांचा मृत्यू झाला होता. शुक्रवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास हवाई दलाच्या 'सी-१३०जे' या विमानातून पार्थिव मायदेशी आणण्यात आले.



### ओव्हरफ्लोची भिंत मोजतेय अखेरची घटका

# उमटे धरणफुटीचा धोका

**1978** उमटे धरणाची निर्मिती

**2017-2019** पासून धरणाच्या संरक्षण भिंतीच्या दुरवस्थेबाबत तक्रार

**धरण फुटल्यास होणार बाधित**

**47** गावे | **33** वाड्या

**3** लाख लोकांचा जीव टांगणीला

दगडांची भिंत खचतेय; 'स्ट्रक्चरल ऑडिट' अद्याप नाही



### भीषण आपत्ती ओढवल्यास जबाबदार कोण? - ॲड. राकेश पाटील यांचा जिल्हा प्रशासनाला सवाल

**। रायगड । प्रतिनिधी ।**

कोकणसह रायगड जिल्ह्यात अतिवृष्टीचे प्रमाण सर्वाधिक आहे. अशातच हजारो गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या काही धरणांची अवस्था अतिशय बिकट झालेली आहे. यापैकी एक असलेले अलिबाग तालुक्यातील उमटे धरणाची ओव्हरफ्लोची भिंत कोणत्याही क्षणी फुटून हाहाकार माजण्याची भीती वर्तवली जात आहे.

पान २ वर

> उमटे धरण दुरुस्ती आणि गाळउपसा या प्रश्नावर आम्ही वर्षनुवर्षे प्रशासनकडे अर्ज विनंत्या करूनही प्रशासन झोपेचे सोंग घेत आहे. अशातच पावसाळ्यात काही मोठी दुर्घटना होऊन जीवितहानी झाल्यास संबंधित अधिकाऱ्यावर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्यात यावेत.
>
> – ॲड. राकेश पाटील, उमटे धरण संघर्ष ग्रुप रायगड



● शाळांची स्वच्छता करताना कर्मचारी.

## ज्ञानमंदिरे गजबजणार

■ आजपासून शाळेची घंटा वाजणार

■ शाळा प्रशासन विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी सज्ज

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

उन्हाळी सुट्टीनंतर आता रायगड जिल्ह्यातील शाळा शनिवारी (दि.१५) पासून सुरु होणार आहेत. विद्यार्थ्यांच्या किलबिलाटासह जिल्हा परिषदेसह खासगी शाळा गजबजणार आहेत. नवा वर्ग, नवी पुस्तके आणि गणवेशही नवा या आनंदात मुले शाळेच्या प्रतीक्षेत आहेत. शाळाही विद्यार्थ्यांच्या आगमनासाठी सज्ज झाल्या आहेत. शाळेत प्रथमच पाऊल ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळेतील शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, सदस्यांनी तयारी जोरात केली असून, गुलाब पुष्पग, गोड पदार्थ देऊन त्यांचे जल्लोषात स्वागत केले जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांनी दिली.

जिल्हाभरात जिल्हा परिषदेच्या अडीच हजार व खासगी जवळपास ५०० हून अधिक शाळांमधून लाखभर विद्यार्थी ज्ञानाचे धडे गिरवत आहेत.

पान २ वर

## चौकीचापाडा जि.प. शाळा नादुरुस्त

**अलिबाग :** तालुक्यातील शहाबाज ग्रामपंचायत हद्दीतील चौकीचापाडा जिल्हा परिषद शाळेची अवस्था जीर्ण झाली आहे. सतत स्लॅब कोसळत आहे. ही शाळा दुरुस्त करण्याची मागणी करूनदेखील जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला असल्याचा आरोप पालकांकडून करण्यात येत आहे.

जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या वाढावी यासाठी शिक्षण विभागाकडून प्रयत्न केले जात आहे. गावातील ग्रामस्थ, महिला, माजी विद्यार्थ्यांकडूनदेखील पटसंख्यावाढीसाठी योगदान दिले जाते. चौकीचापाडा येथील जिल्हा परिषद शाळेची इमारतीचे

पान २ वर

### वेधक

## २७ जूनपासून पावसाळी अधिवेशन

**मुंबई :** राज्य विधिमंडळाचे पावसाली अधिवेशन येत्या २७ जूनपासून सुरु होणार असून, दोन्ही सभागृहांचे कामकाज १२ जुलैपर्यंत चालणार आहे. मात्र, कामकाज वाढवण्याची गरज पडल्यास ते वाढवले जाईल, असे विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, २९ जूनला शनिवार असून, या दिवशी कामकाज होत नाही. मात्र, यावेळेला शनिवारीही सभागृहाचे कामकाज सुरु राहणार आहे. लोकसभा निवडणूक जिंकलेल्या विद्यमान पाच आमदारांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा दिला, तो मी स्वीकारला आहे, असेही नार्वेकर यांनी सांगितले.

पान २ वर

## वीज पडून घराचे नुकसान

**नागोठणे :** नागोठणे परिसरात पावसाने काही दिवसांपासून तुरळक शिडकावा सुरु केला आहे. नागोठणे परिसरात पावसाचे आगमान झालेले असतानाच गुरुवार, दि. १३ जून रोजी सायंकाळी ढगांचा गडगडाट व विजांच्या कडकडाटासह आलेल्या पावसाने नागोठणे शहर व परिसराला चांगलेच झोडपून काढले. यातच नागोठण्याजवळील वेलशेत येथे अजित राम घोडिंदे यांच्या घरावर वीज पडल्याने त्यांच्या घराचे प्लास्टर व इतर बांधकामाचे नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती रोशन पारंगे यांनी वेलशेतच्या तलाठ्यांना दिली. या घटनेचा पंचनामा करण्यात आला आहे.

# जिल्ह्यात भातपेरणीची ५० टक्के कामे पूर्ण

■ पुढील दहा दिवसात शंभर टक्के पेरणीची कामे पूर्ण होणार

■ जिल्हा कृषी विभागाकडून अंदाज व्यक्त

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगडजिल्ह्यामध्येभातपेरणीची लगबग सुरु झाली आहे. शेतकरी पेरणीच्या कामामध्ये मग्न असल्याचे चित्र दिसून येत आहे. आतापर्यंत जिल्ह्यामध्ये ५० टक्के पेरणीची कामे पूर्ण झाली आहेत. सध्या पाऊसदेखील पेरणीयोग्य असून, दहा दिवसात शंभर टक्के पेरणीची कामे पूर्ण होणार असल्याचा अंदाज अधीक्षक व जिल्हा कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

जिल्ह्यामध्ये ९५ टक्क्यांहून अधिक शेतकरी पावसाच्या पाण्यावरच भातपिकाची लागवड करतात. कृषी विभागाने यंदा ९८ हजार हेक्टर क्षेत्रावर

पान २ वर



### शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकांसाठी भात बियाणे

**जिल्ह्यामध्ये भातपिकांमधून शेतकऱ्यांना चांगले उत्पादन मिळावे यासाठी आत्मा अंतर्गत प्रात्यक्षिकांसाठी विद्यापीठाकडून शेतकऱ्यांना मोफत बियाणे वितरीत करण्याची मोहीम हाती घेतली आहे. रत्नागिरी-६, रत्नागिरी-८, कर्जत-९ या जातीची उत्पादन देणारी बियाणे आतापर्यंत चारशेहून अधिक शेतकऱ्यांना देण्यात आली आहेत. सध्या २७९ एकर क्षेत्रामध्ये याची लागवड केली जाणार असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे.**

> भात पेरणीची कामे वेगात सुरू आहेत. ५० टक्के पेरणीची कामे झाली आहेत. उर्वरित ५० टक्के पेरणीची कामे दहा दिवसांमध्ये पूर्ण होतील. सध्या पेरणीयोग्य पाऊस आहे.
>
> – वंदना शिंदे, अधीक्षक व जिल्हा कृषी अधिकारी, रायगड

### सुधागडात जया भात बियाण्याची चणचण

**पाली/बेणसे :** पावसाचे आगमन झाल्याने जिल्ह्यात सर्वत्र भात पेरणी ची कामे सुरु झाली आहेत. यंदा जिल्ह्यात १ लाख १ हजार ५१० हेक्टरवर खरीपाची लागवड करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात

पान २ वर

## राममंदिर बॉम्बने उडविण्याची धमकी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अयोध्येतील श्रीराम मंदिर बॉम्बने उडविण्याची धमकी दिल्याने खळबळ उडाली आहे. ही धमकी दहशतवादी जैश ए मोहम्मदने दिली आहे. दरम्यान, यूपी सरकारने अलर्ट जारी केला आहे. रामनगरीत तैनात असलेल्या सुरक्षा पथकांना सतर्क करण्यात आले आहे. अलर्टनंतर अयोध्येत श्रीराम मंदिर परिसरात सर्व ठिकाणी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. रामललाच्या दर्शन मार्गावरही भाविकांवर पाळत ठेवण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, धमकी देण्यात आलेल्या ऑडिओमध्ये आमिर नावाचा दहशतवादी बोलतोय. आमच्या मशिदीला हटवून मंदिर बनवले आहे. हे मंदिर बॉम्बने उडविण्याची धमकी दिली आहे.

# 'एनडीआरएफ' अद्याप लालफितीत

■ महाडमध्ये कॅम्पसाठी जागा मंजूर

■ केंद्राकडून प्रस्तावाला मंजुरीची प्रतीक्षा

**। महाड । वार्ताहर ।**

महाड शहरामध्ये आपत्कालीन स्थिती उद्‌भवल्यास आणि पूरपरिस्थिती निर्माण झाल्यावर एनडीआरएफ (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल) चे मदतकार्य मोलाचे ठरते. याकरिता शासनाने महाडमध्ये कायमस्वरूपी कॅम्प उभा राहावा याकरिता जागा मंजूर केली असली तरी केंद्र शासनाच्या गृह विभागाकडून अद्याप हा प्रस्ताव लालफितीत अडकला आहे. यामुळे यावर्षीदेखील एनडीआरएफचे जवान ऐन पावसाळ्यातील आपत्कालीन स्थितीतच बोलावले जाणार आहेत.

महाडमध्ये आणि तालुक्यात गेली अनेक वर्षांपासून आपत्कालीन स्थिती उद्‌भवत आहे. १९९५ मध्ये महाडमध्ये पारमाची गावात दरड कोसळून जीवितहानी झाली होती. त्यानंतर सातत्याने विविध ठिकाणी भूस्खलन आणि दरडी कोसळून जीवितहानी आणि वित्तहानी झाल्याच्या घटना घडल्या. त्याचप्रमाणे शहरांमध्ये पुराची परंपरादेखील कायम राहिली आहे. २००५ नंतर २००९, २०१४, २०१६, २०१९, २०२१ या काळामध्ये महाड शहरात कायम पुराने थैमान घातले होते. महाडजवळील सावित्री पूल दुर्घटना त्याचप्रमाणे तारीख गार्डन इमारत दुर्घटना घडल्या होत्या. या आपत्कालीन स्थितीत वारंवार एनडीआरएफच्या जवानांना पाचारण करण्यात आले होते. या ठिकाणी शासकीय विश्रामगृह किंवा अन्य ठिकाणी स्थानिक प्रशासनाकडून या जवानांची राहण्याची आणि जेवणाची सुविधा केली जाते. मात्र, प्रतिवर्षी एनडीआरएफच्या जवानांना महाडमध्ये बोलावं लागत असल्याने याठिकाणी कायमस्वरूपी कॅम्प उभा केला जावा अशी मागणी महाडकर नागरिकांकडून करण्यात आली. या मागणीचा शासनाकडून विचार करून शहराजवळील शासकीय दूध डेअरीची जागा या कायमस्वरूपी कॅम्पसाठी मंजूर करण्यात आली.

या मंजूर केलेल्या जागेमध्ये नदीतून काढण्यात आलेल्या गाळाचा भराव करण्यात आला आहे. एनडीआरएफचा

पान २ वर

## पेणमध्ये डेंग्यूचे थैमान

### जिते, रावेत १२ डेंग्यूचे रूग्ण

**। खरोशी । वार्ताहर ।**

पेण तालुक्यातील जिते गावात डेंग्यूची साथ असल्याची बातमी कृषीवलमध्ये प्रसिद्ध होताच अखेर जिल्हा प्रशासनाबरोबर तालुका प्रशासनाला जाग आली आहे. डेंग्यूची साथ आटोक्यात आणण्यासाठी आशा वर्कर, डॉक्टर, कर्मचारी शर्थीचे प्रयत्न करताना दिसून येत आहेत. सद्यःस्थितीत जिते येथे सात, तर रावे येथे डेंग्यूचे पाच पॉझिटिव्ह रुग्ण खासगी दवाखान्यामध्ये उपचार घेत असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी अपर्णा खेडेकर यांनी दिली.



पान २ वर

कृतज्ञतापूर्वक अभिवादन



कै. शालिनीताई जयराम पाटील

कै. ना.ना. पाटील यांची मुलगी यांच्या १०३ वी जयंतीनिमित्त

त्यांची नातवंडे नृपाल व मृणाल दत्तात्रेय घरत, सौ. मृणालिनी अनुप दंताळे व चि. तनिश अनुप दंताळे (पणतू) व प्रतोष नृपाल घरत.

### चित्रलेखा पाटील मदतीस धावल्या

# सराईकरांचा पाणीप्रश्न सुटला

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

सराई येथील तलावात गाळ साचल्याने पाण्याची साठवण क्षमता कमी झाली होती. त्यामुळे गावामध्ये पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. शेकाप महिला आघाडीप्रमुख चित्रलेखा पाटील यांनी स्वखर्चाने पोकलेन पाठवून तलावातील गाळ काढला. त्यामुळे पाण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे.

सराई गावालगतच तलाव आहे. या तलावातून पाण्याचा वापर येथील नागरिक मोठ्या प्रमाणात करीत आहेत. मात्र, तलावामध्ये गाळ मोठ्या प्रमाणात साचला. त्याचा परिणाम पाण्याची टंचाई निर्माण झाली. तलावामध्ये पाणी नसल्याने महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागली. ही बाब परिसरातील शेकाप युवा नेतृत्व अमित फुंडे यांनी शेकापच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यांनी तातडीने दखल घेत स्वखर्चाने पोकलेन पाठवून गाळ काढून घेतला. अमित फुंडे आणि दिलीप शेळके यांनी डंपरची व्यवस्था केली. चित्रलेखा पाटील यांच्या पुढाकाराने गावातील पाण्याचा प्रश्न सुटल्याने ग्रामस्थांसह महिलावर्गाने समाधान व्यक्त केले.

### तलावातील गाळ काढल्याने पाणी साठवण क्षमता वाढली



SHRI. GOPINATH MAHADEO VEDAK PRATISHTHAN'S

**G. M. VEDAK INSTITUTE OF TECHNOLOGY**

Approved by AICTE, Recognized by Govt. of Maharashtra & Affiliated to University of Mumbai.

**ACCREDITED NAAC 'B'**

**WALK-IN INTERVIEW For Teaching and Non-Teaching**

| Sr. No. | Position | Department | No. of Post |
|---|---|---|---|
| 1 | PROFESSOR | Civil, Computer and Mechanical Engineering | Each 01 |
| 2 | ASSOCIATE PROFESSOR | Civil, Computer and Mechanical Engineering | Each 01 |
| 3 | ASSISTANT PROFESSOR | ASH Department (M.Sc. Physics) | 01 |
| 4 | | Computer Engineering | 03 |
| 5 | | Civil Engineering | 01 |
| 6 | SR. CLERK / JR. CLERK | Administration | 01 |
| 7 | PEON/ LAB ATTENDANT | Office / Respective Dept. | 03 |

- Sr. No. 6 & 7 preference will given for Local Candidates & Marathi/English Typing required.
- Qualification as per AICTE and UGC norms.
- Candidates must present in the institute along with updated **CV** and they send their **CV** at principal@gmvit.com. **Mob. 9022802204** **Website: www.gmvit.com**
- Bring All the original documents and **2 sets of photocopies** of relevant documents

**Dates of Walk-in Interview 18th and 19th June 2024**

Sd/-
Principal

# पाऊस येताच बत्ती गुल

## ■ महावितरणचा कारभार विस्कळीत ■ सततच्या खंडित वीजपुरवठ्यामुळे संताप



**। महाड । प्रतिनिधी ।**
**महाडसह परिसरामध्ये मान्सूनने दमदार वेळेत हजेरी लावली आहे. मात्र, या पहिल्याच पावसात महावितरणचा कारभार विस्कळीत झाला असून, सततच्या खंडित वीजपुरवठ्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. धो धो पाऊस सुरु झाल्यास काय स्थिती निर्माण होईल, असा प्रश्नदेखील स्थानिक नागरिक करत आहेत.**

राज्यात मान्सूनने वेळेत हजेरी लावली असली तरी महाड आणि परिसरामध्ये गेली दोन-चार दिवसांपासून पाऊस कमी-अधिक प्रमाणात पडत आहे. काही ठिकाणी जोराचा वारादेखील सुटत आहे. या पहिल्याच पावसात महावितरण विभागाचा कारभार विस्कळीत झाला आहे. गेली काही दिवस सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे, यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. मान्सूनपूर्व कामांसाठी महावितरण विभागाने गेली काही दिवस सातत्याने वीजपुरवठा खंडित ठेवला होता. मात्र, तरीदेखील पावसाळा सुरू झाल्यानंतर या ना त्या कारणाने वीजपुरवठा खंडित होत आहे. महाड परिसरामध्ये अनेक गावांतून आजही सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे, यामुळे लघु व्यावसायिकांवरदेखील परिणाम होत आहे. आठवड्यातून दोन ते तीन वेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याने दुग्धजन्य पदार्थ आईस्क्रीम आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्याचप्रमाणे इतर व्यावसायिकदेखील हवालदिल झाल्या आहेत. वीज बिल भरले गेले नाही तर वीजपुरवठा खंडित करण्याची सूचना करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून पावसाळ्यापूर्वी केल्या जाणाऱ्या कामांची दखल मात्र वेळेत घेतली जात नाही. जागोजागी वृक्षांच्या फांद्या वीजतारांवरून आजही लटकत आहे. शिवाय, जागोजागी ट्रान्सफार्मर सताड उघडे पडले आहेत. यामुळे शेतकऱ्यांच्या, नागरिकांच्या जीविताला धोकादेखील निर्माण झालेला आहे. पावसाळ्यापूर्वी केली जाणारी कामे पावसाच्या तोंडावर केली जात असल्याने ऐन पावसाळ्यात सातत्याने वीजपुरवठा खंडित केला जात आहे. यामुळे नागरिकदेखील प्रचंड संतप्त झाले आहेत. अशी कामे एक महिना आधीच करणे आवश्यक आहे. पावसाळ्यापूर्वी केली जाणारी कामे ही सकाळीच करणे आवश्यक होते, मात्र भरदुपारी वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने उष्णतेच्या काळात नागरिक हैराण झाले होते. या परिस्थितीत आजही बदल झालेला नसून कमी पावसामुळे उष्ण वातावरण कायम आहे, त्यातच सातत्याने वीजपुरवठा खंडित होत असल्याने केल्या जाणाऱ्या कामांवर आणि त्यांच्या गुणवत्तेवर संशय व्यक्त केला जात आहे. महावितरणकडून सध्या स्थिती अनेक कामांचे ठेके दिले जात आहेत. या ठेकेदारांकडून निकृष्ट दर्जाची साधने वापरली जात असल्याचे तक्रार नागरिक करत आहेत. याबाबतीत अधिकारीदेखील जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत, असा नागरिकांचा आरोप आहे. सातत्याने खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

## ई-रिक्षा भंगारात जाण्याची भीती



**नेरळ :** माथेरान या पर्यटनस्थळी माणसे माणसाला ओढणारी अमानवी प्रथा बंद व्हावी म्हणून पर्यावरणपूरक ई-रिक्षा सुरु करण्यात आल्या आहेत. शासनाने माथेरान नगरपरिषदेकडून ठेकेदार पद्धतीने सात ई-रिक्षा खरेदी करून त्यांच्या माध्यमातून पायलट प्रकल्प राबविला. दरम्यान, माथेरान पालिकेने सरकारी निधीमधून खरेदी केलेल्या सात रिक्षा नवीन पायलट प्रकल्पामुळे सायडिंगमध्ये लावण्यात आल्या आहेत. दरम्यान, पुढील सहा महिने या ई-रिक्षा सायडिंगमध्ये राहणार असल्याने त्या ई-रिक्षा भंगारात जाण्याची शक्यता आहे.

# पटसंख्या वाढवण्यासाठी उपाययोजना राबवा

## मुख्याधिकाऱ्यांच्या मुख्याध्यापकांना सूचना

**। खोपोली । वार्ताहर ।**
सर्व प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांची शाळांचे पट वाढविण्याच्या अनुषंगाने सर्व प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांची नुकतीच बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत पटसंख्या वाढवण्यासाठी विविध उपाययोजना राबवाव्यात, अशी सूचना खोपोली नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी नगरपरिषदेंतर्गत येणाऱ्या सर्व प्राथमिकशाळांच्यामुख्याध्यापकांना केल्या आहेत.

दरम्यान, खोपोली नगरपरिषद प्राथमिक विभागाच्या १५ शाळा असून, त्यामध्ये मराठी माध्यमाच्या १२, उर्दु माध्यमाच्या २ आणि हिंदि माध्यमाची १ शाळा आहे. सदर शाळांमध्ये सद्यःस्थितीत १८९२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

यावेळी घेतलेल्या बैठकीमध्ये मुख्याधिकाऱ्यांनी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये सर्व शाळांचे पट वाढविण्याच्या अनुषंगाने विविध उपाययोजना राबविण्याच्या सूचना दिल्या. तसेच विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळावा या अनुषंगानेदेखील उपक्रम राबविण्याच्या सूचना दिल्या. शाळांतील प्रत्येक वर्ग डिजिटल करणे, शाळेत रेन हार्वेस्टींग सिस्टीम राबविणे, शाळेत सोलर सिस्टीम बसविणे, शाळा परिसरात झाडे लावणे, तसेच विद्यार्थ्यांना आहाराबाबत माहिती देण्याबाबतही सूचना केल्या. या बैठकीस शिक्षण विभागाचे मुख्य लिपीक निशिकांत सुर्वे व केंद्र व्यवस्थापक लियाकत पठाण उपस्थित होते.

# मोफत नेत्रतपासणी शिबीर

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**
पनवेल येथील डॉ. सुहास हळदीपुरकर यांच्या लक्ष्मी आय चॅरिटेबल ट्रस्ट आणि ग्रामपंचायत चिरनेर यांच्या संयुक्त विद्यमाने चिरनेर गावातील श्रीराम मंदिरात दि. सात जून रोजी मोफत डोळे व मोतीबिंदू तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टचे डॉ. विनोद पाचघरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या संपूर्ण टीमने शिबिरात सहभाग घेतलेल्या चिरनेर परिसरातील स्त्री-पुरुष रुग्णांची मशीनद्वारे डोळ्यांची मोफत तपासणी केली.

या शिबिरात चिरनेर परिसरातील जवळजवळ १०० हून अधिक स्त्री-पुरुष रुग्णांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली.

यामध्ये रुग्णांना मोफत चष्मांचे वाटप करण्यात आले. तर बारा रुग्णांवर लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल येथे मोतीबिंदूची मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली. चिरनेर येथे भरविण्यात आलेल्या डोळे तपासणीच्या शिबिराला तसेच पनवेल येथे लक्ष्मी आय चॅरिटेबल ट्रस्ट येथे मोतीबिंदूची शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या रुग्णांची सरपंच भास्कर मोकल, उपसरपंच सचिन घबाडी, ग्रामसेवक महेश पवार तसेच चिरनेर ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य यांनी भेट घेऊन, रुग्णांना योग्य ते सहकार्य व मार्गदर्शन केले. शिबीर यशस्वी करण्यासाठी चिरनेर ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.





# मुरुड आगाराच्या प्रवेशद्वाराची दुरवस्था

## स्थानिक नागरिकांसह प्रवाशांकडून नाराजी

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**
गेले तीन ते चार वर्षे रखडलेले मुरुड जंजिरा एसटी बस आगारातील राहिलेले महत्त्वाचे अंतर्गत भागातील काँक्रिटीकरण अद्याप पूर्ण झाले नसल्याने प्रवासी, व्यापारी, मुरुडकर नागरिक संतापले असून, तीव्र नाराजी व्यक्त करीत आहेत. मुरूड तालुका पर्यटन तालुका असल्याने आणि बाहेरील सर्व प्रवाशांची मदार एसटी सेवेवर अवलंबून असल्याने आगारातील बसेस नवीन आणि सुस्थितीत असाव्यात, मात्र अधिक बसेस जुन्याच आहेत.

मुरूड आगारातील काही भागाचे काँक्रिटीकरण यापूर्वीच झाले आहे. मात्र, काही महत्त्वाचे भागाचे काँक्रिटीकरण तीन वर्षे रखडले आहे. पावसात सध्या काही भागात काँक्रिट ओतण्यात आले आहे; मात्र हे कामदेखील थांबले आहे. आगाराच्या प्रवेशद्वारावर दरवर्षी पावसाळ्यात शेकडो खड्डे पडतात, यातून प्रवाशांना त्रास सहन करावा लागतो. दरम्यान, खड्ड्यात पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम शुक्रवारी सुरू करण्यात आले आहे.

# ‘करंजाडे ते पनवेल स्टेशन बसफेऱ्या वाढवा’



**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**
वाढत्या प्रवासी संख्येमुळे करंजाडे वसाहत ते पनवेल रेल्वे स्थानकापर्यंत सुरु असलेली नवी मुंबई महापालिकेची बससेवा अपुरी पडत असून, प्रवाशांना बसची वाट पाहात ताटकळत उभे राहावे लागत आहे. एनएमएमटीने बस फेऱ्यांमध्ये वाढ करावी, अशी मागणी करंजाडे वसाहतीमधील नागरिक करीत आहेत.

रेल्वे स्टेशन गाठण्यासाठी करंजाडेतील रहिवासी नवी मुंबई पालिकेच्या बससेवेवर अवलंबून आहेत. त्याचप्रमाणे या प्रवासासाठी शेअर रिक्षासुद्धा उपलब्ध आहेत. मात्र, रेल्वे स्थानक ते करंजाडे वसाहतीपर्यंतच्या रस्त्यावर नेहमीच होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे स्टेशन ते वसाहत हा प्रवास अत्यंत धीम्या गतीने होत असल्याने रेल्वे स्थानक परिसरात प्रवाशांना रिक्षा किंवा बसची वाट पाहात ताटकळत बसावे लागत असल्याने एनएमएमटी बसच्या फेऱ्या वाढवण्यात याव्यात, अशी मागणी कंरजाडे नोड पलॅट ओनर्स वेल्फेअर असोसिएशन पनवेलचे अध्यक्ष चंद्रकांत महादेव गुजर यांनी पत्राद्वारे केली आहे.

मुंबई, नवी मुंबई तसेच ठाणे येथील कार्यालयात कामाला असलेला कामगार वर्ग करंजाडे यथे मोठ्या संख्येने वास्तव्यास आहे. कामा ठिकाणी पोहोचण्यासाठी ते लोकल रेल्वेचा वापर करतात, करंजाडे वसाहतीत रेल्वे स्टेशन उपलब्ध नसल्याने रेल्वे स्टेशन गाठण्यासाठी त्यांना रिक्षा अथवा एनएमएमटी च्या ७६ क्रमांकच्या बसचा वापर करावा लागतो. अनेक भागात वाहतूक कोंडी होऊन रिक्षा तसेच बस वाहतूक कोंडीत अडकत असल्याने रेल्वे स्थानकातून वसाहतीत प्रवासी पोहोचवण्यात वेळ लागतो.

> **नवी मुंबई महापालिका परिवहन महामंडळाच्या बसच्या फेऱ्यांमध्ये वाढ झाल्यास प्रवाशांना होणारी गैरसोय दूर होईल. त्यामुळे बस फेऱ्या वाढवाव्यात, अशी अपेक्षा आहे.**
> **– चंद्रकांत महादेव गुजर, अध्यक्ष, कंरजाडे नोड पलॅट ओनर्स वेल्फेअर असोसिएशन**

पान १ वरून

## उमटे धरणफुटीची धोका

असे घडल्यास उमटे धरण फुटीच्या आपत्तीला जबाबदार कोण, असा संतप्त सवाल उमटे धरण संघर्ष समितीचे अ‍ॅड. राकेश पाटील यांनी जिल्हा प्रशासनाला केला आहे.

अ‍ॅड. पाटील यांनी शुक्रवारी (दि.१४) मे रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी रा.जि. परिषद, कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, तसेच रायगड जिल्हाधिकारी यांना उमटे धरण संघर्ष ग्रुपच्या वतीने निवेदन दिले आहे. त्यांनी निवेदनात नमूद केले आहे की, अलिबाग तालुक्यातील ४७ गावे व ३३ वाड्या ह्या उमटे धरणाच्या पाण्यावर अवलंबून आहेत. सदरच्या उमटे धरणाची निर्मिती ही १९७८ साली करण्यात आली असून, सदरचे धरण जीवन प्राधिकरणामधून रायगड जिल्हा परिषदेस १९९५ साली हस्तांतरीत झाले आहे. उमटे धरणाच्या बांधकामानंतर धरणाच्या संरक्षण भिंतीची व बांधाची दुरूस्ती कधी आणि केव्हा झाली याची माहिती स्थानिकांना नाही. तसेच धरणाच्या दुरूस्तीवर किती खर्च झाला आहे, याचीही माहिती स्थानिकांना नाही.

उमटे धरणाची व धरणाचे संरक्षण करणाऱ्या भिंतीची व बांधाची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. सन २०१७ ते २०१९ पासून आपल्या कार्यालयात धरणाच्या संरक्षण भिंतीच्या दुरवस्थेबाबत तक्रार अर्ज करूनही कोणतीही कारवाई केली जात नाही. त्यामुळे पावसाळ्यात धरणाच्या ओव्हरफ्लोची संरक्षण भिंतीच्या खालची माती खचून दगडांची भिंत शेवटची घटका मोजत असून, सदरची संरक्षण भिंत या पावसाळ्यात वाहून जाऊन धरण फुटून मोठी हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी तातडीने धरणाचे आणि धरणाच्या संरक्षण भिंतीचे ‘स्ट्रक्चरल ऑडिट’ करणे आवश्यक आहे. कोकणासह रायगड जिल्ह्यात आपत्तीच्या घटना घडलेल्या आहेत. त्या रोखण्यासाठी सरकार आणि प्रशासन आपत्ती घडल्यावर उपाययोजना करतात. त्यामुळे अशी आपत्ती घडण्याआधीच ४७ गावे व ३३ वाड्या अंदाजे ३ लाखांच्या वर लोक प्रभावित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे तातडीने उमटे धरणाची व धरणाच्या संरक्षण बांधांचे व भिंतींचे ‘स्ट्रक्चरल ऑडिट’ करून ओव्हरफ्लोच्या भिंतीचे तात्काळ बांधकाम करून धरणाचे संरक्षण करण्यात यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

## ज्ञानमंदिरे गजबजणार

एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यानंतर परीक्षा संपल्या. त्यानंतर शाळांना सुट्टी सुरु झाली. दोन महिन्याच्या सुट्टीनंतर १५ जून रोजी शाळा सुरु होणार आहे. त्यानिमित्ताने लागणारे कंपास, वही, दप्तर अशा अनेक प्रकारचे शालेय साहित्य खरेदी करून विद्यार्थी सज्ज झाले आहेत. शाळा सुरु होण्यापूर्वी शाळेतील शिक्षकांना दोन दिवस अगोदरच शाळेत जाऊन स्वच्छता, साफसफाई करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये साफसफाईची लगबग दिसून आली. शिक्षण विभागाने यापूर्वी शाळापूर्व तयारी अभियान राबवून नव्याने शाळेत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी एक वेगळा उपक्रमही हाती घेतला आहे. जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढावी यासाठी अनेक शाळांतील शिक्षकांनी पुढाकार घेत घरोघरी जाऊन पालकांसोबत संवाद साधला. जिल्हा परिषद शाळेचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्नदेखील केला आहे. जिल्ह्यातील शाळांमध्ये प्रवेशोत्सव साजरा केला जाणार आहे.

**आज मिळणार विद्यार्थ्यांना पुस्तके**

रायगड जिल्हा परिषद तसेच अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना शासनाकडून पाठ्यपुस्तके देण्यात येतात. ही पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी मिळतील असे नियोजन करण्यात आले आहे. सरकारच्या बालभारती विभागाकडे शिक्षण विभागाने पुस्तकांची मागणी केली होती. सरकारकडून पुस्तके प्राप्त झाली असून, ही पुस्तके तालुक्याच्या गटशिक्षण अधिकाऱ्यांमार्फत केंद्रप्रमुख व केंद्रप्रमुखांच्या माध्यमातून मुख्याध्यापकांकडे सुपूर्द करण्यात येत आहेत. पहिली ते आठवीपर्यंतच्या १ लाख ८४ हजार १६२ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात येणार आहेत.

शनिवारपासून शाळा सुरु होणार आहे. शाळा प्रवेशोत्सवाची तयारी करण्यात आली आहे. पहिल्या दिवशीच पोषण आहार देण्याचा प्रयत्न केला आहे. नवविद्यार्थ्यांचे स्वागत केले जाणार आहे. जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थी आले पाहिजे यासाठीदेखील प्रयत्न केला आहे. - प्रमोद भोपी, केंद्रप्रमुख, आंदोशी

जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षणासह संस्कारक्षम नागरिक घडविण्याचे शिक्षण दिले जाते. माझे शिक्षणही जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले असल्याने मी माझ्या मुलालासुद्धा याच शाळेत प्रवेश घेतला आहे. येथील शिक्षकांची साधी आणि सोपी शिकवण्याची पद्धत माझ्या मुलाच्या प्रगतीत आयुष्यात मोलाची ठरेल, याचा मला विश्वास आहे. - राजेंद्र पाटील, पालक, चौलमळा

## चौकीचापाडा जि.प. शाळा नादुरुस्त

बांधकाम आरसीसीचे आहे. या इमारतीचे छताचे तुकडे पडत आहेत. स्लॅबचे लोखंडी स्टील गंजलेले असून, तेदेखील पडत आहेत. या शाळेत विद्यार्थ्यांची पटसंख्या चांगली असतानादेखील या शाळेची अद्यापपर्यंत दुरुस्ती करण्यात आली नाही. शाळेची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात आली आहे. मात्र, जिल्हा परिषदेकडून कोणत्याही प्रकारचा ठोस निर्णय घेतला नाही, असा आरोप अलिबाग पंचायत समितीचे माजी सभापती बाळू पाटील यांनी केला आहे. शनिवारपासून शाळा सुरू होणार आहेत. पावसाळ्यात एखाद्या अनुचित प्रकार घडल्यास त्याला जिल्हा परिषद प्रशासन जबाबदार राहील, असा इशारादेखील देण्यात आला आहे. शाळेची पटसंख्या ४९ असून, ग्रामीण विभागात विद्यार्थी पटसंख्या एक नंबर आहे. दरवर्षी शाळेमध्ये तालुका स्तरावर आणि विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी विविध उपक्रम शाळा व्यवस्थापन समितीतर्फे राबविले जातात. जर शाळेची अशी दुरवस्था झाली, तर शाळेच्या पटसंख्येवर परिणाम होऊन विद्यार्थी पटसंख्या कमी होण्यास प्रशासन जबाबदार राहील, असे सांगण्यात आले आहे. १५ जून रोजी शाळेच्या पहिल्याच दिवशी शाळेला कुलूप लावून शाळा व्यवस्थापन समिती, सर्व पालक व विद्यार्थी हे शाळेच्या गेटसमोर उपोषणाला बसतील, असे अलिबाग पंचायत समितीचे माजी सभापती जनार्दन पाटील (बाळूशेट पाटील) व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विवेक काशिनाथ म्हात्रे यांनी सांगितले आहे.

चौकीचा पाडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या समस्यांबाबत पाहणी केली जाणार आहे. या शाळेच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. - पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी

## पेणमध्ये डेंग्यूचे थैमान

तालुका आरोग्य अधिकारी म्हणाल्या की, ३० मेपासून रावेमध्ये चार टीम तयार करून सर्वे सुरू केला आहे. त्यामधून असे समजले की, रावे गावामध्ये पिण्याचे पाणी रोजच्या रोज येत नसल्यामुळे ग्रामस्थ पाण्याची साठवण करून ठेवतात. या पाण्याच्या साठवणीमुळेच डास तयार होत असल्याने पाच पॉझिटिव्ह डेंग्यूचे रुग्ण सापडले आहेत. जिते व रावे येथे डेंग्यूची साथ पसरल्यामुळे गावातील सात हजार दोनशे आठ पाणी साठवलेल्या टाक्यांची तपासणी केली असून, त्यापैकी ३५६ टाक्यांमध्ये आळ्या सापडल्या आहे. या पैकी २९७ टाक्यांमध्ये औषध फवारणी केली असून, ५९ टाक्या रिकाम्या केल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली. तसेच जिते गावांमध्ये फवारणी चालू असून, सद्यःस्थितीला आशा वर्कर तिथे काम करत असून, आरोग्य सेवक रजेवर असल्याने ते सोमवारी हजर होतील आणि आपलं काम सुरू करतील. दरम्यान, जिते व रावे गावांमध्ये डेंग्यूचे रुग्ण सापडले असल्याने त्यांचे नमुने जिल्ह्याला पाठवलेले आहेत. त्यामधून रुग्ण पॉझिटिव्ह सापडले, तर जिते गावांमध्ये साथ जाहीर करणार, अशी माहिती डॉ. अपर्णा खेडेकर यांनी दिली.

## जिल्ह्यात भातपेरणीची कामे ५० टक्के पूर्ण

भातपीक लागवड करण्याचे नियोजन केले आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून भात पेरणीला सुरुवात झाली आहे. काही शेतकऱ्यांना पावसाच्या अगोदर धूळवाफे पेरणी केली. तर काही शेतकऱ्यांनी जूनच्या पहिल्या आठवड्यात पाऊस सुरु झाल्यावर पेरणीला सुरुवात केली. काही ठिकाणी भाताच्या रोपांनी उगवण केली आहे. आतापर्यंत जिल्ह्यात पडत असलेला पाऊस पेरणीसाठी पोषक आहे. त्यामुळे शेतकरीदेखील पेरणीच्या कामाला लागले आहेत. ही कामे वेगात सुरु आहेत. काहीजण पारंपरिक नांगरणीद्वारे, तर काही शेतकरी नवनवीन अवजारांद्वारे पेरणी करीत आहेत. जिल्ह्यामध्ये भाताच्या एकूण क्षेत्रापैकी दहा टक्के क्षेत्रामध्ये पेरणी केली जाते. आतापर्यंत ५० टक्के म्हणजे चार हजार ८२९ हेक्टर क्षेत्रामध्ये पेरणीची कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित सुमारे पाच हजार हेक्टर क्षेत्रामध्ये दहा दिवसांमध्ये भात पेरणीची कामे पूर्ण होतील, असा विश्वास कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

## भात बियाण्याची चणचण

आले आहे. प्रामुख्याने ९८ हजार ४८७ हेक्टरवर भाताची लागवड केली जाणार आहे. तर ३ हजार ०२३ हेक्टरवर नागली लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मात्र, सुधागड तालुक्यात कृषी सेवा केंद्रावर जया हे भाताचे बियाणे उपलब्ध नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. काही दिवसांपूर्वी पेण तालुक्यात जया भात बियाणे उपलब्ध नसल्याच्या तक्रारी जिल्हा कृषी कार्यालयाकडे आल्या होत्या. मात्र, लागलीच कृषी विभागाने याची दखल घेऊन सर्व कृषी केंद्रांवर बियाणे उपलब्ध करून दिले आहे, अशी माहिती जिल्हा कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी दिली.

## ‘एनडीआरएफ’ अद्याप लालफितीत

कॅम्प या जागेमध्ये उभा केला जावा याकरिता या जागेला मंजुरीदेखील देण्यात आली. या जागेमध्ये कायमस्वरूपी एनडीआरएफचा कॅम्प उभा केला जावा यासाठी केंद्र शासनाच्या गृह विभागाकडे प्रस्तावदेखील पाठवण्यात आला. हा प्रस्ताव पाठवून दोन पावसाळे झाले तरी अद्याप या प्रस्तावाला मंजुरी मिळालेली नाही. यामुळे एनडीआरएफच्या कॅम्पकरिता आरक्षित केलेली जमीन अद्याप तशीच पडून आहे. केंद्र शासनाच्या गृह विभागाकडून महाडमध्ये कायमस्वरूपी एनडीआरएफ कॅम्प उभा करण्याच्या बाबतीत उदासीनता आहे. महाडपासून पुणे, मुंबई हे अंतर जवानांना पोहोचण्यास पुरेसे असल्याने महाडमध्ये कायमस्वरूपी कॅम्प उभा करण्याबाबत अद्याप मंजुरी देण्याबाबत कार्यवाही झाली नसल्याने हा प्रस्ताव अद्याप लालफितीत अडकला आहे.

## २७ जूनपासून पावसाळी अधिवेशन

आज मुंबईतल्या विधान भवनात अधिवेशन कामकाज ठरविण्याकरिता कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्षनेते आणि गट नेते उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार कामानिमित्त बाहेर असल्यामुळे ते उपस्थित राहू शकले नाहीत. तसे त्यांनी कळवले होते, असे नार्वेकर यांनी सांगितले. सरकार फक्त १२ दिवस कामकाज चालवणार हे आम्हाला मान्य नाही, असे काँग्रेसचे भाई जगताप यांनी पत्रकारांना सांगितले.

## चविष्ट अळंबी हंगाम सुरू

**माथेरान :** माथेरानच्या जंगलात उगवणारी अळंबी हे पहिल्या पावसाचे प्रमुख वैशिष्ट्य. सुरुवातीला पावसाचे आगमन झाले की, पुढील दोन ते तीन आठवडे येथील माथेरानच्या जंगलात निसर्गाचे देणे असलेली अळंबी नजरेस पडते. माथेरानमध्ये पहिला पावसाळा सुरू झाला की येथील जंगल परिसरात पडलेल्या पालापाचोळ्यामध्ये पांढरी शुभ्र अळंबी उगवते. या पांढऱ्या शुभ्र रंगाच्या व अत्यंत छोट्या छत्रीच्या आकाराच्या अळंबीची चव ही येथील सर्वच आबालवृद्धांच्या जिभेवर रेंगाळत राहते. काही तज्ज्ञांच्या मते, अळंबी ही हरितद्रव्यविरहित बीज धारण करणारी बुरशी आहे. या अळंबीस भूछत्र असेही म्हणतात. तर, पुरातन काळापासून संस्कृतमध्ये कुसुंप व पौराणिक ग्रंथात भूछत्र म्हणून अळंबीचा उल्लेख आढळतो.



# महामार्गाबाबत फक्त आश्वासने



**। कोलाड । वार्ताहर ।**
केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी इंदापूर येथील सभेत मुंबई-गोवा महामार्ग ६६ वरील चौपदरीकरणाचे काम २०१८ ला पूर्ण होईल असे सांगितले होते. नंतर सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी गेल्या गणेशोत्सवापूर्वी महामार्गाची एक लाईन पूर्ण होईल व डिसेंबर २०२३ पर्यंत संपूर्ण महामार्गाचे काम पूर्ण होईल, असे सांगितले होते. परंतु, महामार्गाचे काम पूर्ण होऊ शकले नाही, फक्त आश्वासाने, लोकनेत्यांची तारीख पे तारीख झाली फेल अशीच परिस्थिती पाहावयास मिळत आहे. तर इंदापूर, कोलाड, खांब, सुकेळी खिंड, वाकण येथे संथ गतीने काम सुरु आहे.

या महामार्गाची कामे सुरु असलेल्या ठिकाणी गायब झालेले सर्व्हिस रोड, नियम न पाळताच बनविलेले स्पीड ब्रेकर, रस्त्यासाठी वापरण्यात आलेले निकृष्ट दर्जाचे सामान, ठेकेदारावर प्रशासनाचा नसलेला वचक, अशा नियोजनशून्य कारभारामुळे हा मार्ग रखडला आहे. परंतु, याचा परिणाम प्रवाशांना भोगावा लागत आहे. आता तर या महामार्गाचे काम डिसेंबर २०२४ अखेर पूर्ण होईल अशी नवीन डेड लाईन देण्यात आली आहे. परंतु, महिदरा नदीवरील पुलाचे काम, उड्डाण पुलाचे काम, मोऱ्यांचे काम अजूनही बाकी असल्यामुळे हे काम या कालावधीत पूर्ण होईल असे वाटत नाही. परंतु याचा नाहक त्रास वाहन चालकांसह प्रवाशांना भोगावा लागत आहे.

# प्रलंबित मागण्यांकरिता कर्मचाऱ्यांचे निवेदन



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**
महाराष्ट्र राज्य नगरपरिषद, नगरपंचायत कर्मचारी व संवर्ग संघर्षसमितीच्याप्रदीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या विविध मागण्या मान्य करण्याकरिता मुरुड नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

यावेळी रायगड जिल्ह्याचे व मुरुड नगरपरिषदेचे कामागार संघटनेचे अध्यक्ष राकेश पाटील, उपाध्यक्ष प्रकाश आरेकर, खजिनदार संजय वेटकोळी, परेश कुंभार, नरेंद्र नांदगांवकर, सतेज निमकर, सुदेश माळी, स्वप्नजा विरुकुड, उमेश शिंदे, जयेश चोडणेकर, संजय बामगुडे, प्रणाली करडे, मितेश माळी, दिपक शिंदे, रिया मांढरे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित मागण्या तात्काळ मार्गी लावण्यात याव्यात, यासाठी मुख्याधिकाऱ्यांकरवी मुख्यमंत्र्यांना देण्यासाठी निवेदन सादर केले आहे.

निवडक

## सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**रसायनी :** रसायनी परिसरात चोरीच्या घटनेत वाढ झाली असून चांभार्ली येथील बालाजी हाईट्स रूममध्ये चोरी झाल्याची घटना घडली. कल्पेश पाटील यांनी आपल्या घरातील सोन्याच्या दागिन्यांची चोरी झाल्याची तक्रार रसायनी पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.कल्पेश पाटील यांच्या घराचा दरवाजा अज्ञात चोरट्यांनी तोडून घरात प्रवेश करून २ लाख ४० हजार रूपये किंमतीचे ८ तोळे वजनाचे मंगळसूत्र, सोन्याच्या पट्ट्या त्यात काळेमणी असा ऐवज चोरून नेला आहे.

## ग्राहकांची फसवणूक

**पनवेल :** चारधाम यात्रेला घेवून जातो असे सांगून फसवणूक करणाऱ्या टुर्स कंपनीतील एकाला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.दिनेश पाटील असे त्याचे नाव असून त्याने प्रमोदकुमार ठाकूर या ज्येष्ठ नागरिकांना व त्यांच्या नातेवाईकांना तसेच इतर अनेक व्यक्तींना चारधाम यात्रेकरिता घेवून जातो असे सांगून यांच्याकडून ६८ हजार रुपये घेवून त्यांना चारधाम यात्रा न करवता किंवा कोणताही मोबदला परत न देता त्यांची आर्थिक फसवणूक केली.

## अध्ययन कौशल्य प्रशिक्षण

**खांब :** श्री. विवेकानंद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, रोहा व ज्ञानप्रबोधिनी, शैक्षणिक उपक्रम संशोधिका,पुणे यांच्या द्वारे स्वयं अध्ययन कौशल्य प्रशिक्षण वर्ग इयत्ता दहावीसाठी रोहा येथे पार पडला. या प्रशिक्षणाचे उद्घाटन सुशील रुळेकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमातंर्गत विद्यार्थ्यांकडून उदिष्ट निश्चिती, वेळेचे नियोजन, अभ्यास पायऱ्या माहितीवर प्रक्रिया करणे तसेच अभ्यासातील अडथळे कसे दूर करायचे अशी विविध सत्रे कृतीद्वारे घेण्यात आली.

## कारचा लावला शोध

**पनवेल :** पोलिसांच्या तांत्रिक तपासामुळे अवघ्या काही तासातच हरविलेली कार मालकाला पुन्हा मिळवून देण्यात पोलिसांना यश आले. मनोज राणे त्यांची कार चोरी झाली म्हणून तक्रार देण्याकरिता पनवेल शहर पोलीस ठाण्यात आले होते. सीसीटीव्हीची पाहणी करताना तक्रारदार स्वतः कार घेऊन जाताना दिसले. त्या अनुषंगाने तक्रारदाराकडे चौकशी केली असता त्यांनी काही कामानिमित्त उरणनाका येथे घेऊन जाऊन पार्क केली व ते विसरून गेले असे निष्पन्न झाले.

## दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल :** अज्ञात वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेलजवळील पळस्पे फाटा पुलाखाली घडली. विष्णूपंत कुलकर्णी हे त्यांच्या ताब्यातील मोटारसायकल घेवून घरी जात असताना पळस्पे फाटा पुलाखाली अज्ञात वाहनाची त्यांच्या गाडीला धडक बसून त्यात ते गंभीररित्या जखमी झाले. त्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अज्ञात वाहनाचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

# आपत्ती निवारण आराखडा मंजूर

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**रायगड जिल्ह्यात नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण सर्वाधिक आहे. दरवर्षी निर्माण होणाऱ्या आपत्तींचा धोका कमी करण्यासाठी कोकण आपत्ती धोके सौम्यीकरण योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत जिल्हा प्रशासनाकडून दोन वर्षांपूर्वी एक हजार ८०० कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. राज्यातील सत्तांतरण, अधिकाऱ्यांचे दुर्लक्षामुळे हा प्रस्ताव लालफितीत अडकला होता. लोकसभा निवडणुकीपूर्वी रायगड जिल्ह्यासाठी एक हजार १० कोटीचा आराखडा मंजूर करण्यात आला असून आचारसंहितेनंतर कामांच्या निविदा प्रक्रिया सुरू झाल्या आहेत. या निधीतून संरक्षक भिंत, खारबंदिस्ती, बहुद्देशीय निवारा शेड आदी कामे केली जाणार आहे. यामुळे दरवर्षी आपत्तींमुळे हैराण होणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळणार आहे.**

### एक हजार १० कोटींची होणार कामे

नैसर्गिक आपत्तीमुळे दरवर्षी कोट्यवधींची वित्तहानी तसेच जीवितहानीला सामोरे जावे लागते. रायगडमधील नैसर्गिक आपत्तींचा मुकाबला करण्यासाठी मंजूर केलेल्या एक हजार १० लाख रुपयांच्या विविध कामांची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. निधीच्या कम तरतेमुळे जिल्ह्यात उभारण्यात येणाऱ्या बहुद्देशीय निवारा शेडचे बांधकाम दोन वर्षांपासून रखडले होते. यातील काही कामे प्रदीर्घ कालावधीची आहेत.



निसर्ग, तौक्ते चक्रीवादळ येऊन गेल्यानंतर आपत्ती सौम्यीकरणाची कामे करण्यात यावी, अशी मागणी जोर धरू लागली होती. आतापर्यंत स्थानिक निधीतून काही किरकोळ कामे केली जायची. लोकसभा निवडणुका जाहीर होण्यापूर्वीच राज्य सरकारने कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत प्रस्तावास निधी मंजूर केला आहे. यातील विविध कामांची निविदा प्रक्रिया सुरू झाली असून यातील काही कामांची सुरुवात चालू पावसाळ्यातच करण्याचा प्रयत्न जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचा आहे.

नैसर्गिक आपत्तीपासून बचाव करण्यासाठी पायाभूत सुविधांची गरज असून त्या उभारण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने एक हजार ८०० कोटींचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला होता. यातील एक हजार १० कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिली आहे. यात सर्वाधिक खर्च भूमिगत विद्युत वाहिनीच्या कामांसाठी केला जाणार आहे.

### राबवण्यात येणारी कामे

- १४ जुन्या खारबांधाचे बळकटीकरण – ७५.८६
- १० नवीन बांध – ३५.००
- ४ जुने बांधाचे बळकटीकरण– ४०.००
- १४ गावांमध्ये निवारा शेड – ५.६०
- महाड शहरात २० निवारा शेड – ३६.५६
- महाड जिल्हा परिषद शाळांची दुरुस्ती – १.१७
- चक्रीवादळ निवारा केंद्र –४१.५०
- अलिबाग उपविभागअंतर्गत १७ शाळांची दुरुस्ती – ३.७१
- महाड तालुक्यात २८ निवारा केंद्र – ६५.४९
- महाडमध्ये निवारा केंद्रासाठी भूसंपादन – ६.३३
- भूमिगत विद्युत वाहिनी – ६९९.६८

२००५ पासून नैसर्गिक आपत्तींत संरक्षण मिळण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. परंतु इतक्या मोठ्या प्रमाणात पहिल्यांदाच उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत. नवीन व जुन्या खारबंधाऱ्यांचे नूतनीकरण, समुद्र धूप प्रतिबंधात्मक बंधारा बांधणे, चक्रीवादळ, पूर व दरडप्रवण गावांमध्ये बहुउद्देशीय निवारा केंद्र बांधणे, आपत्तीप्रवण गावांमध्ये भूमिगत विद्युत वाहिनी टाकणे, महाड शहरात सावित्री नदीलगत संरक्षक भिंत बांधणे, बीएसएनएलचे केबल भूमिगत टाकणे, महाड नगरपरिषदेसाठी आवश्यक आपत्कालीन सोयी सुविधा निर्माण करणे, निवारा शेडमध्ये आवश्यक शोध व बचाव साहित्य उपलब्ध करण्यासाठी हा निधी खर्च केला जाणार आहे.

# ‘स्त्रियांचे आरोग्य’ पुस्तकाचे प्रकाशन

**। पाली /बेणसे । वार्ताहर ।**

ग्रंथालीने प्रसिद्ध केलेल्या प्रख्यात स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. राजश्री दयानंद कटके लिखित ‘स्त्रियांचे आरोग्य’ या पुस्तकाचे प्रकाशन विविध क्षेत्रातील प्रतिभावंत मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.


मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात, महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते झाले. यावेळी विधानपरिषदेच्या आमदार भारती लव्हेकर, डॉ. तात्याराव लहाने, पद्मा धामणे राव, पत्रकार राही भिडे, पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. कटके यांच्या मातोश्री आणि सासरे मंचावर उपस्थित होते.

पुस्तकाचे प्रकाशन झाल्याचे जाहीर करून डॉ. गोऱ्हे यांनी हे फार महत्त्वाचे आणि सोप्या भाषेत लिहिलेले पुस्तक आहे, अशी पुस्तकाबद्दल प्रशंसा केली. त्या म्हणाल्या, स्त्रियांच्या आरोग्याविषयी अनेक पुस्तके आहेत, परंतु हे पुस्तक नेमकी माहिती देते. याचे वैशिष्ट्य म्हणजे ते स्त्रियांच्या पर्समध्ये राहील या आकाराचे आहे. त्यामुळे ते हवे तेव्हा वाचता येईल. आज समाज माध्यमातून अनेक प्रकारे उपचार सांगणारे व्हिडिओ टाकले जातात, त्यासाठी तपासणी करण्याबाबत सुचवले जाते. मात्र त्यात किती तथ्य असते याचा विचार करायला हवा. डॉ. कटके यांचे पुस्तक आपल्या मनातील प्रश्नांची सुबोध पद्धतीने उत्तरे देते. वयाच्या विविध टप्प्यांवर होणारे आजार, त्यासाठी घ्यायची काळजी याबद्दल पुस्तकात माहिती आहेच, शिवाय आहारविहार, व्यायामाचे महत्त्व यातून शारीरिक आरोग्यासह मानसिक तंदुरुस्ती कशी राखावी याचेही मार्गदर्शन करते. आरंभी ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रास्ताविक केले.

# काशिद-बीच रस्त्यावर झाड कोसळले

**। कोर्लई । वार्ताहर ।**

गेल्या दोन दिवसांपासून मुरुड तालुक्यात पावसाने दमदार हजेरी लावली असून आज पहाटेच्या वेळेस साळाव-मुरूड रस्त्यावर काशिद-बीच रस्त्यावर जुने मोठे भेंडीचे झाड कोसळले.सकाळच्या वेळेत वाहतूक तुरळक असल्याने सुदैवाने जीवित व वित्तहानी टळली आहे.



साळाव-मुरुड रस्त्यावर काशीद-बीच रस्त्यावर भेंडीचे झाड पडल्याने काही वेळ वाहतूक ठप्प झाली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता रमेश गोरे यांना झाड पडल्याचे वृत्त समजताच सहायक कनिष्ठ अभियंता गणेश मार्कंड, सहायक कनिष्ठ अभियंता रोशन पाटील यांनी घटनास्थळी दाखल होऊन जेसीबी व कटरच्या सहाय्याने येथील पडलेले भेंडीचे झाड हटविण्यात येऊन रस्त्यावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली.

## मांजरीच्या पिल्लाला मिळाले जीवदान

**पनवेल :** पनवेल शहरातील निल समृद्धी सोसायटी नं.१ येथे गेले दोन दिवस मांजीचे पिल्लू अडकून पडले होते. त्याला नेचर फ्रेंडस् सोसायटीच्या सदस्यांनी व पनवेल अग्नीशमन दलाने रेस्क्युद्वारे जीवनदान दिले आहे. गेले दोन दिवस मांजराचे एक लहान पिल्लू दुसऱ्या मजल्यावरील खिडकीच्या सज्जावर अडकून पडले होते. आईविना सारखे ओरडत होते. तात्काळ सर्प मित्र व नेचर फ्रेंडस् सोसायटीचे पनवेल सदस्य शार्दुल वारंगे यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी लगेचच पनवेल अग्नीशमन दलाला कळवून पूर्ण टिम बोलावली. भर पावसात अथक त्या पिल्लाची सुटका केली.

# दुचाकींनी व्यापला रहदारीचा रस्ता

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वेच्या मेन लाईनवरील कर्जत दिशेकडील शेलू स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली आहे. त्या प्रवाशांकडून उपनगरीय प्रवास करताना घरातून आणल्या जाणाऱ्या दुचाकी यांनी रेल्वे स्टेशनकडे येणारा रस्ता व्यापला आहे. दुचाकी दाटीवाटीने उभ्या करण्यात येत असल्याने चालणाऱ्या प्रवाशांना वाट काढणे कठीण होऊन बसले आहे.



शेलू स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली आहे.शेलू स्थानकातून लोकलने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या जशी वाढली आहे तसे या भागातील वाहनांची वर्दळ देखील वाढली आहे.मात्र त्यामुळे स्थानकात प्रवाशांच्या वर्दळीमुळे ओसंडून वाहत असतात.शेलू रेल्वे स्थानकातून प्रवास करणारे बहुसंख्य प्रवासी हे पूर्व भागात गावाकडील उभ्या राहिलेल्या वसाहतीमध्ये राहणारे आहेत. त्यामुळे त्या भागातून स्थानकात येणारे दोन्ही रस्ते प्रवाशांच्या वर्दळीमुळे सकाळच्या वेळी भरलेले असतात.

तेच रस्ते मागील काही महिन्यापासून प्रवाशी सोबत घेऊन येत असलेल्या वाहनांच्या वर्दळीमुळे भरून जाऊ लागले आहेत. शेलू गावातून स्टेशनकडे येणार आणि तेथील वसाहतीच्या मागील बाजूस असलेला रस्ता हा पूर्णपणे वाहनांच्या वर्दळीमुळे चालण्यास बंद झाले आहेत. दुचाकी वाहने अशी वेडीवाकडी लावण्यात येत आहेत. त्यामुळे स्थानकात येणाऱ्या पादचारी यांना चालणे कठीण होऊन बसले आहे. दुसरीकडे या दुचाकींमुळे रेल्वे स्टेशन वर येणारे दोन्ही रस्ते हे कोणत्याही चारचाकी वाहने यांच्यासाठी बंद झाले आहेत. त्यामुळे एखाद्या रुग्णाला स्थानकातून नेण्यासाठी रुग्णवाहिका आली तर त्या रुग्णवाहिकेला स्थानकापर्यंत येण्यास रस्ता शिल्लक नाही. दुसरीकडे या ठिकाणी प्रवाशांच्या वाहनांसाठी कोणत्याही प्रकारची सुविधा नाही आणि पार्किंग देखील नाही. अशा स्थितीत मध्य रेल्वे प्रशासनाने रेल्वे प्रवाशांच्या वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था करावी अशी मागणी पुढे येत आहे.

# महिलांना शिलाई मशीन वाटप

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरूड तालुक्यातील आगरदांडा येथे कॉमन सर्व्हिस सेंटर व अदानी फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक सुरक्षा लाभ अभियान अंतर्गत महिलांना शिलाई मशिन संच वाटपाचा कार्यक्रम ग्रामपंचायत कार्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. ग्रामपंचायत सरपंच आशिष हेदुलकर, उपसरपंच संतोष पाटील, सर्व ग्रामपंचायत सदस्य, सेंटर आगरदांडाचे प्रमुख शाकिब गजगे व अदानी फाऊंडेशन वरिष्ठ प्रकल्प अधिकारी जयश्री काळे मान्यवर उपस्थित होते.

सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. सर्वसामान्य जनतेसाठी केंद्र आणि राज्य सरकार तर्फे विविध उपक्रम राबविले जातात. या उपक्रमाअंतर्गत महिलांना सशक्त व आत्मनिर्भर करण्यासाठी या अभियान अंतर्गत ६ लाभार्थ्यांना अदानी फाऊंडेशन आणि शासनाच्या सेंटर अंतर्गत व उषा स्किल सेंटर योजना प्रकल्प यांच्या अंतर्गत शिलाई मशीन वाटप करण्यात आले. शासनाच्या विविध योजनांची माहिती व महत्व अदानी फाऊंडेशनचे अवधूत पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकात पटवून दिले.

यावेळी सहा लाभार्थ्यांना शिलाई मशीन संच वाटप करण्यात आले. लाभार्थ्यांपैकी नांदले गावातील एका दिव्यांग व्यक्तीलाही शिलाई मशीन संच देण्यात आलह. डोंगरी एक व आगरदांडा येथे चार शिलाई मशिन संच देण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अवधूत पाटील, प्राजक्ता आदुळकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मुरूड तालुक्यात भात पेरणीला वेग

**। मुरूड । वार्ताहर ।**

मुरूड तालुक्यात सोमवारी पूर्व मोसमी पावसाने तालुक्याला झोडपून काढले. पावसाने तारांबळ उडवून दिली होती. त्यानंतर गुरुवारपर्यंत पाऊस पुन्हा गायब झाल्याने तापमान ३१ सेल्सिअसपर्यंत वाढले होते. शुक्रवार पासून मेघगर्जनेसह मोसमी पाऊस पडायला सुरुवात झाल्याने भात पेरणीसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरू झालेली दिसत आहे. मोठा पाऊस पडण्याआधीच पेरणी आटोपून घेण्याची लगबग वाढली आहे.



शुक्रवार पहाटेपासून पाऊस सक्रिय झाल्याचे दिसून आले असून हवेत देखील गारवा जाणवू लागला आहे.पाऊस नसल्यामुळे उकाड्याने मुरूडकर आणि आलेले पर्यटक हैराण होताना दिसून आले. पावसाळी पर्यटनासाठी पर्यटक दाखल होत असून गेस्टहाऊस मालकांनी यास दुजोरा दिला.

शुक्रवारपासून पावसाची रिमझिम सुरू असून शेती कामांना वेग आला आहे. धुळवाफे झाल्यानंतर शेतकरी बांधवांनी पेरणीसाठी कंबर कसली आहे अशी माहिती शिघ्रे येथील शेतकरी रघुनाथ माळी यांनी दिली. मुरूड तालुक्यातील विहुर, मजगाव, उसरोली, आदाड, खारआंबोली, उंडरगाव, शिघ्रे, वाणदे, जोसरांजन, तेलवडे, नागशेत वावडुंगी, सायगाव पंचक्रोशीत अनेक ठिकाणी शेतकरी भात पेरणीसाठी सरसावला आहे. घरातील सदस्य, मिळेल तसे मजूर घेऊन पेरणीला वेग आल्याचे दिसत आहे. अनेक शेतकऱ्यांनी सांगितले की, मजुरी वाढली आहे.मजूरदेखील मिळत नाहीत. अनेक तरुणांनी नोकरीसाठी मुंबई पुण्याची वाट धरली असल्याने शेती करणाऱ्या तरुणांची ओढ कमी होऊ लागली आहे. मुरूड तालुक्यातील भात शेती पूर्णपणे पावसावरच अवलंबून आहे.भात पेरणी केलेल्या शेत जमिनीत रोपे वर आली आहेत.

## ज्येष्ठांच्या काळजीचे आवाहन

**खांब :** आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठीच्या कायद्याविषयी माहिती देण्यासाठी शनिवारी (दि.१५) आई-वडील व ज्येष्ठ नागरिक छळ प्रतिबंध जागृती दिन साजरा करण्याचे आवाहन रायगड जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघाच्या समन्वय समितीने जिल्हाभरातील संघटनांना केले आहे. या कायद्यांतर्गत पाल्याकडून निर्वाह खर्च देण्याची तरतूद आहे, कायद्याचे कलम २ प्रमाणे पाल्य म्हणजे जेष्ठ नागरिकांचे संबंधातील मुले व नातवंडे यांचा समावेश आहे. ज्येष्ठांनी चरितार्थासाठी, निर्वाह भत्त्यासाठी संबंधित जिल्हा सहा.आयुक्त समाज कल्याण विभाग यांच्याकडे अर्ज करावयाचा आहे.

# गेल इंडिया उसर येथे रक्तदान शिबीर

### रक्तदात्यांचा मोठा प्रतिसाद

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

उसर गेल इंडियामध्ये १४ जुन जागतिक रक्तदाता दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

गेल इंडिया लिमिटेड, उसर यांच्या वतीने जिल्हा सामान्य रूग्णालय अलिबाग, प्रिझम सामाजिक विकास संस्था अलिबाग यांच्या वतीने १४ जुन रोजी होणाऱ्या जागतिक रक्तदाता दिवसाचे औचित्य साधून फर्स्ट एड सेंटर, गेल इंडिया लिमिटेड उसर या ठिकाणी गेल इंडिया लि. महाप्रबंधक पीडीएचपीपी प्रोजेक्ट गेल अनुज गुप्ता, महाप्रबधंक जितिन सक्सेना, मुख्य प्रबधंक वरिष्ठ अधिकारी अपूर्व निंबाळकर, सहाय्यक अधिकारी सुजन ठाकूर यांचे मार्गदर्शनाखाली व प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्षा तथा राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी भारत सरकार तपस्वी नंदकुमार गोंधळी व जिल्हा सामान्य रूग्णालय रायगड-अलिबाग यांचे सहकार्याने रक्तदान शिबीराचे आयोजित करण्यात आले होते.

उसर गेल इंडिया कंपनीच्या फर्स्ट एड सेंटरमध्ये सकाळी दहा वाजता रक्तदान शिबिरास सुरूवात झाली, प्रारंभी गेल इंडिया लिमिटेड उसर या ठिकाणी गेल इंडिया लि. महाप्रबंधक पीडीएचपीपी प्रोजेक्ट गेल अनुज गुप्ता, महाप्रबधंक जितिन सक्सेना, यांनी सुध्दा रक्तदान केले. यावेळी एकूण ३३ रक्तदात्याने रक्तदान करून आयोजीत रक्तदान शिबिरास प्रतिसाद दिला.

या रक्तदान शिबिरास जिल्हा सामान्य रूग्णालय अलिबाग यांचे वतीने रक्त संक्रमण पतपेढीचे डॉ. दिपक गोसावी, वैभव कांबळे, अभिषेक घरत, सुशांत भगत, मंगेश पिंगळा, साक्षी मयेकर, सुनिल म्हात्रे व गेल इंडिया लि.वतीने सहाय्यक अधिकारी सुजन ठाकूर, प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी गोंधळी व सहकारी प्रणाली तळेगांवकर यांचे विशेष सहकार्य लाभले.



### यंदा १२४ दिवस सुट्ट्या,सार्वजनिक सुट्टी ७६ दिवस, दिवाळी सुट्टी १२ दिवसांची, उन्हाळा सुट्टी ४३ दिवस

# शाळांच्या सुट्ट्यांची यादी जाहीर

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**यंदाच्या शैक्षणिक वर्षातील सार्वजनिक सट्ट्यांची यादी प्राथमिक शिक्षण विभागाने जाहीर केली आहे. २०२४-२५ मध्ये सार्वजनिक सुट्ट्या ७६ दिवसांच्या तर वर्षातील रविवार, असे मिळून यंदा १२४ दिवस शाळा बंद राहणार आहेत. तर दिवाळीची सुट्टी १२ दिवसांची असणार आहे.**



जिल्हा परिषदेच्या शाळांची वेळ सकाळी साडेदहा ते पाच वाजेपर्यंत असेल. अर्ध्या दिवसाच्या शाळेची वेळ सकाळी नऊ ते दुपारी साडेबारा वाजेपर्यंत असणार आहे. रमझान उपवासानिमित्त उर्दू माध्यमाच्या प्राथमिक शाळा सकाळी नऊ ते दुपारी अडीच वाजेपर्यंत भरतील, असे स्पष्ट केले आहे.

शाळेच्या कामकाजाच्या दिवशी ६० मिनिटांची मोठी सुट्टी तर पहिल्या व दुसऱ्या सत्रात दहा मिनिटांच्या दोन लहान सुट्ट्या असतील. प्राथमिक शाळा सतत तीन दिवस बंद राहणार नाहीत, याची दक्षता मुख्याध्यापकांनी घ्यायची आहे. यादीतील सुट्ट्या सोडून इतर दिवशी थोर महापुरुषांची जयंती, पुण्यतिथी असल्यास त्या दिवशी शाळा भरवून विविध स्पर्धांचे आयोजन करावे. २६ नोव्हेंबर रोजी शाळेत संविधान दिन साजरा करावा, असेही शिक्षणाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

मुख्याध्यापकाच्या अधिकारात एक सुट्टी दिली जाते तर गावची स्थानिक यात्रा असेल, त्या दिवशी देखील एक सार्वजनिक सुट्टी दिली जाते. यंदाच्या शैक्षणिक वर्षातील सार्वजनिक सुट्ट्या या दोन सुट्ट्यांचाही समावेश आहे.

### या दिवशी असणार सार्वजनिक सुट्टी

**जून (बकरी ईद), २१ जून (वटपौर्णिमा), १७ जुलै (मोहरम, आषाढी एकादशी), १५ ऑगस्ट (स्वातंत्र्य दिन- पारशी नववर्ष), १९ ऑगस्ट (रक्षाबंधन), २ सप्टेंबर (पोळा), ७ सप्टेंबर (गणेश चतुर्थी), ११ सप्टेंबर (गौरीपूजन), १६ सप्टेंबर (ईद ए मिलाद), १७ सप्टेंबर (अनंत चतुर्दशी), २ ऑक्टोबर (महात्मा गांधी जयंती), ३ ऑक्टोबर (घटस्थापना), १२ ऑक्टोबर (दसरा), २८ ऑक्टोबर ते ९ नोव्हेंबर (दीपावली), १५ नोव्हेंबर (गुरूनानक जयंती), २५ डिसेंबर (ख्रिसमस, नाताळ), १४ जानेवारी (मकर संक्रांती), २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन), १९ फेब्रुवारी (छत्रपती शिवाजी महाराज जयंती), २६ फेब्रुवारी (महाशिवरात्री), १४ मार्च (धूलिवंदन), १९ मार्च (रंगपंचमी), ३० मार्च (गुढीपाडवा, रमझान ईद), ६ एप्रिल (रामनवमी), १० एप्रिल (महावीर जयंती), १४ एप्रिल (डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती), १८ एप्रिल (गुडफ्रायडे), १ मे (महाराष्ट्र दिन), २ मे ते १४ जून (उन्हाळा सुट्टी).**

# शिकारीआधीचे हाकारे

राजेमहाराजे शिकार करायला जातात तेव्हा त्यांच्यासोबत शिपायांची मोठी फौज असते. एखादे सावज दिसले की शिपाई त्याला चारही बाजूने घेरतात. हाकारे घालून आणि त्याचा पाठलाग करून त्याला नेमके महाराजांच्या बंदुकीच्या टप्प्यात आणले जाते. मग योग्य वेळ साधून महाराज बार टाकतात. सध्या अजितदादा पवारांसंदर्भात भाजप परिवाराकरवी जे काही चालू आहे ते पाहता असेच हाकारे घालणे चालू आहे की काय असा संशय यावा. भाजपच्या वॉशिंग मशीन राजकारणावर टीका करण्यासाठी सर्व भारतभरचे नेते अजित पवारांना कसे महायुतीत घेतले गेले याचा दाखला देतात. वास्तविक अजितदादांच्या कथित भ्रष्टाचाराच्या कितीतरी पटीने अधिक गैरव्यवहार करणारे अनेक नेते आज भाजपमध्ये आहेत. तरीही बदनामी मात्र केवळ अजितदादांचीच झाली. नंतरही अजितदादांना घेतल्याने भाजपचे मतदार नाराज असल्याची कबुली देवेंद्र फडणवीस यांच्यासारख्यांनी दिली. लोकसभा निवडणुकीत कशीबशी एक जागा मिळाल्यावर दादांच्या राष्ट्रवादीचा शेअर आणखी घसरला. आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ऑर्गनायझर या मुखपत्राने दादांसोबत युती करून भाजपने आपली ब्रँड व्हॅल्यू कमी करून घेतल्याचे म्हटले आहे. भाजपची यंदा लोकसभेला जोरदार पीछेहाट झाली. तब्बल साठ जागा कमी झाल्या. खरे तर हा नरेंद्र मोदींचा पराभव आहे. कारण, सगळी निवडणूक त्यांनी मोदी या नावाभोवती फिरवली. संघ तर सोडाच तर भाजपच्या देखील एकाही नेत्याला पक्षाच्या पोस्टरमध्ये स्थान नव्हते. त्यामुळे पीछेहाटीची जबाबदारी त्यांचीच आहे. पण संघवाले त्याबाबत काही बोलायला तयार नाहीत. कारण, ते मोदींना घाबरतात किंवा मोदींनी संघाचे नेते व कार्यकर्ते यांना मिंधे करून टाकले आहे. सत्तेचे वेगवेगळे फायदे व प्रचंड पैसा संघाला उपलब्ध झाला आहे. तो संघाला सोडवत नाही. भाजपवर आज निवडणुकीवरून टीका करणे म्हणजे मोदींनाच जबाबदार धरणे आहे. ती हिंमत संघ दाखवत नाही.

### बारामतीत फूट

या स्थितीत भाजपच्या मित्रांवर पराभवाचे खापर फोडणे हाच सोपा मार्ग आहे. संघाचे मुखपत्र तेच करीत आहे. त्यातच अजितदादांची बाजू अगदीच लंगडी आहे. त्यामुळे त्यांना धोपटणे सोपे आहे. एकनाथ शिंदे यांना फोडल्यानंतर अजितदादांना फोडण्याची काय गरज होती हे खुद्द भाजप नेत्यांनाही अजून कळलेले नाही. तरीही त्यांचे समर्थन करीत राहणे त्यांना भाग आहे. त्यानुसार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे यांनी लगेच याबाबत सारवासारव केली आहे. दादांमुळे भाजपला फायदा झाल्याचे ते म्हणाले. मात्र माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटलांच्या मुखातून खरे काय ते बाहेर आले. संघ हा आपल्याला आईवडिलांसारखा आहे आणि तो चुका दाखवत असेल तर ते ऐकून घ्यायला हवे, त्याला उलट बोलता कामा नये असे पाटील यांनी बजावले आहे. याचाच अर्थ संघाची दादांवरची टीका पाटलांना मान्य आहे. अजितदादांच्या आग्रहामुळेच पाटील यांचे पुण्याचे पालकमंत्रिपद गेले होते. शिवाय, स्थानिक आमदार असून दादांनी आजवर सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये त्यांची भरपूर मानहानी केली आहे. त्याचा राग बहुदा पाटील यांनी जाहीरपणे काढून घेतलेला असावा. ते काहीही असले तरी दादांची संगत हे नसते लोढणे आहे हे अनेक भाजपवाल्यांचे म्हणणे पाटील यांनी अप्रत्यक्षरीत्या बोलून दाखवले आहे. पण आता हे लोढणे सहजासहजी काढून टाकणे शक्य नाही. दादांना घेताना शरद पवार यांचे राजकारण संपवणे हा भाजपचा उद्देश होता हे याच चंद्रकांत पाटलांनी यापूर्वी सांगितले होते. त्यांच्या याच उद्गारांमुळे बारामतीत आपल्याला फटका बसला हे अजित पवारांनी त्यांना सुनावले होते. पक्षश्रेष्ठींकडे याची तक्रार करणार असल्याचेही ते म्हणाले होते. यंदा लोकसभेच्या निवडणुकीत भाजपचे राजकारण यशस्वी झालेले नाही. उलट त्यांच्यावर उलटले आहे. मात्र पवारांचे घर फोडण्यामध्ये त्यांना यश मिळाले आहे. त्यामुळे बारामतीच्या मतदारांमध्येही फूट पडली आहे. ती यापुढे कायम राहील हेच भाजप नेत्यांना यश वाटू शकते.

### संघर्षाची तयारी

या स्थितीत अजितदादा काय करणार हा प्रश्न आहे. त्यांच्यासमोरचे पर्याय कमी होत चालले आहेत. त्यातच राष्ट्रवादीच्या राज्यसभेच्या जागेसाठी त्यांनी सुनेत्रा पवार यांची उमेदवारी दाखल केली आहे. आधीच दादांवर भ्रष्टाचाराचे व घराणेशाहीचे आरोप आहेत. सुनेत्रा यांना उमेदवारी देणे ही कदाचित दादांची कौटुंबिक गरज असू शकेल. पण राजकीयदृष्ट्या हा अत्यंत आत्मघातकी निर्णय म्हणावा लागेल. दादांची राष्ट्रवादी आज ज्या स्थितीत आहे व भाजपवाले त्यांना ज्या रीतीने घेरत आहेत ते पाहता त्यांनी पक्षातील अन्य नेत्याला ही उमेदवारी देऊन पक्ष बळकट करायला हवा होता. पण ते हे करू इच्छित नाहीत किंवा काही कारणास्तव करू शकत नाहीत. त्यामुळे भाजपवर बाजू उलटवण्याची संधी सध्या ते शोधत आहेत. याचाच एक भाग म्हणून लोकसभेतील पराभवाला भाजपची धोरणे व नेत्यांची वक्तव्ये जबाबदार आहेत असे दादा सुचवत आहेत. चारशेपार जागांच्या घोषणेमुळे दलित व मुस्लिम मतदारांनी एकगठ्टा विरोधी मतदान केले असे ते म्हणत आहेत. शिवाय, मुस्लिमांसाठीचे आरक्षण कायम राहायला हवे असे मतही त्यांनी व्यक्त केले आहे. कदाचित चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगू देसमने ही भूमिका लावून धरलेली असल्याने त्यांना बळ मिळाले असावे. नायडू यांचे पुत्र नारा लोकेश यांनी मुस्लिमांसाठीचे आरक्षण हे लांगूलचालन नसून समाजातील दुर्बल घटकांसाठीची गरज असल्याचे स्पष्टपणे बजावले आहे. निवडणूक प्रचारात मुस्लिम आरक्षणाच्या विरोधात गहजब माजवणाऱ्या नरेंद्र मोदींना हे थेट व सणसणीत प्रत्युत्तर आहे. दादांनाही या मुद्द्यांचा उपयोग होऊ शकतो. शिवाय, आगामी विधानसभेला दलित व मुस्लिमांचा पाठिंबा मिळाल्याखेरीज आपली स्थिती सुधारणे शक्य नाही हे त्यांच्या लक्षात आले आहे. त्यामुळे तेही आता भाजपसोबतच्या आगामी संभाव्य छुप्या संघर्षांना तयार होत आहेत. संघाचे हाकारे व भाजपमधून त्याच्या समर्थनार्थ उठणारे आवाज पाहता हा संघर्ष लवकरच उघड्यावर येईल असे दिसते.

**विचार**

# भाजपचे दक्षिणायन आणि राजकीय सांगावा

***लोकसभेच्या निकालांमध्ये भारतीय जनता पक्षाला दिल्ली, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड ही चार राज्ये वगळता उत्तर आणि पश्चिम भारतात मोठा फटका बसला. मात्र पश्चिम बंगालमध्ये कमी झालेल्या जागा ओडिशा आणि पूर्वेतर राज्यांमध्ये भरून निघाल्या. उत्तर आणि पश्चिम भारतातील नुकसान दक्षिण भारतात भरून निघाले. देशाच्या राजकारणाचे हे दक्षिणायन भविष्यात कसे प्रत्ययाला येईल?***

**श्रीनिवास राव**

उत्तर भारतात जागा कमी होतील, असं भाजपला वाटलं नव्हतं; परंतु 'चारसो पार' करण्यासाठी भाजपला दक्षिण दिग्विजय महत्त्वाचा वाटत होता. यापूर्वी दक्षिणेत भाजपला केवळ कर्नाटकच सर करता येत होते. यावेळी मात्र महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील सर्व राज्यांमधील जागा वाढवण्याची व्यूहनीती आखून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी प्रचार केला. गरज पडेल तिथे धर्माचा आधार घेतला. काही ठिकाणी जातींना गोंजारले. निवडणूक प्रचाराच्या माध्यमातून वातावरणनिर्मितीचे प्रयत्न झाले. मात्र तरीही अपेक्षेइतक्या जागा मिळाल्या नाहीत. असे असले तरी मिळालेल्या जागांचे महत्त्व नाकारण्यासारखे नाही. पुढच्या काळात भाजपला चंचूप्रवेश करण्यासाठी मिळालेली जागा तर अजिबात दुर्लक्षून चालणार नाही. दक्षिणेतील सर्वात मोठे राज्य असणाऱ्या तमिळनाडूमध्ये भाजपला खाते उघडता आले नसले तरी तेथील मतांमध्ये वाढ झाल्याने पक्षविस्ताराची उत्तम संधी निर्माण झाली. तेलंगणा आणि आंध्र प्रदेशने भाजपला हवाहवासा जनाधार दिला. तेलुगु देसम पक्ष (टीडीपी) आणि जनसेना पक्ष (जेसीपी) यांच्याशी युती केल्याने भाजपला तिथल्या सत्तेत सहभागी होता आले. पाच वर्षांनंतर राज्यात 'एनडीए'चे सरकार स्थापन झाले. दक्षिणेत विस्तारासाठी प्रयत्न करणाऱ्या भाजपसाठी ही समाधानाची बाब ठरू शकते. किंबहुना, राजकीय भवितव्य लक्षात घेता दक्षिणेतील समिकरणे बदलू शकतात.

दक्षिण भारतातील पाच राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये मिळून लोकसभेच्या एकूण १३२ जागा आहेत. सर्वात मोठे राज्य असणाऱ्या तमिळनाडूमध्ये ३९ जागा आहेत. कर्नाटकमध्ये २८, आंध्र प्रदेशमध्ये २५, केरळमध्ये २० तर तेलंगणामध्ये १७ जागा आहेत. लक्षद्वीप, पुद्दुचेरी आणि अंदमान-निकोबारमध्ये प्रत्येकी एक जागा आहे. गेल्या वेळी या राज्यांमध्ये दोन्ही मोठ्या राष्ट्रीय पक्षांना प्रत्येकी २९ जागा मिळाल्या होत्या तर इतर पक्षांना ७४ जागांवर यश मिळाले होते. यंदा भाजपला दक्षिणेत २९ जागाच मिळाल्या, मात्र निवडणूकपूर्व युतीमुळे मित्रपक्षांच्या रुपात आणखी सुमारे २२ जागा पदरात पाडून घेता आल्या. पूर्वी कर्नाटक सोडले तर दक्षिणेकडील राज्यांमध्येही भाजपची कामगिरी फारशी चांगली नसायची. गेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये कर्नाटकमध्ये भाजपला मोठी आघाडी मिळाली होती. राज्यातील लोकसभेच्या २८ पैकी २५ जागा भाजपने जिंकल्या होत्या. पण वर्षभरापूर्वी विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने मिळवलेल्या विजयाने भाजपसाठी कर्नाटकही बहुमत मिळवण्यासाठी अवघड ठरलेल्या राज्यांच्या यादीत गेले. या वेळी भाजपने येथे धर्मनिरपेक्ष जनता दलाबरोबर युती केली. पण धर्मनिरपेक्ष जनता दलाचे प्रज्वल रेवण्णा तसेच त्यांच्या वडिलांचे कथित लैंगिक अत्याचार प्रकरण उघडकीस आल्याचा फटका भाजपला बसेल असे वाटले होते. तसेच कर्नाटकमध्ये विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसने भाजपला चारलेली धूळ पाहता भाजपच्या जागांवर परिणाम होईल, असे वाटले होते; परंतु प्रत्यक्षात तसे न होता भाजपला फक्त दहा जागांचा फटका बसला. मित्रपक्ष धर्मनिरपेक्ष जनता दलालाही दोन जागा मिळाल्या. सत्ताधारी काँग्रेसला केवळ नऊ जागांवर समाधान मानावे लागले.

दक्षिणेतील तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये काँग्रेसने दोन तर भाजपने एका जागी विजय मिळवला. पुद्दुचेरीमध्ये काँग्रेसने बाजी मारली खरी, पण भाजपने अंदमान निकोबारची जागा काँग्रेसकडून हिसकावून घेतली. लक्षद्वीपमध्ये काँग्रेसने बाजी मारली. ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसची होती. तेलंगणामध्ये लोकसभेच्या १७ जागा आहेत. पाच महिन्यांपूर्वी झालेल्या निवडणुकीत या राज्यात काँग्रेसचे सरकार आले होते. पण तरीही इथे भाजपने चांगल्या जागा मिळवल्या. गेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला इथे चार जागा मिळाल्या होत्या. या वेळी आठ जागा जिंकून भाजपने येथील सत्ताधारी काँग्रेसला भविष्यासाठी मोठा धोका निर्माण करण्याचे संकेत दिले आहेत. या राज्यात काँग्रेस आणि भाजपमध्ये तुल्यबळ स्पर्धा होती. राज्यावर सत्ता गाजवणाऱ्या भारत राष्ट्र समिती या प्रादेशिक पक्षाची सत्ता पाच महिन्यांपूर्वी संपुष्टात आली. आंध्र प्रदेशमध्ये नव्या मैत्रीकराराचा फायदा झाला. लोकसभेच्या २५ जागा असणाऱ्या या राज्यात प्रादेशिक पक्षांसोबतची युती भाजपच्या कामी आली. भाजपने लोकसभेच्या तीन जागा जिंकल्या. पाच वर्षांपूर्वीच्या निवडणुकीत भाजपला इथे खातेही उघडता आले नव्हते. भाजपचा मित्रपक्ष तेलुगु देसम पक्षाने १६ तर जनसेना पक्षाने दोन जागा जिंकल्या. सत्ताधारी वायएसआर काँग्रेसला केवळ चार जागा मिळाल्या. भाजपच्या मतांच्या टक्केवारीतही मोठी वाढ झाली. त्यांनी सहा जागांवर निवडणूक लढवून ११ टक्क्यांहून अधिक मते मिळवली. गेल्या वेळी त्यांना एक टक्काही मते मिळाली नव्हती.

तमिळनाडूमध्ये अण्णामलाई यांच्याकडून भाजपला खूप अपेक्षा होत्या. त्यांनी भाजपसाठी जोरदार प्रचारही केला होता. भाजपने राज्यात सक्रिय असणाऱ्या छोट्या पक्षांसोबत आघाडी करून सत्ताधारी द्रमुकला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. यात त्यांना यश मिळाले नसले तरी मतांची टक्केवारी वाढली. केरळमध्ये काँग्रेसची लाट असूनही भाजपने खाते उघडले. सुरेश गोपी त्रिशूरमधून विजयी झाले. लोकसभेच्या २० जागा असणाऱ्या केरळमध्ये भाजपचा हा पहिला विजय आहे. त्यांना या राज्यात १६ टक्क्यांहून अधिक मते मिळाली. ती काँग्रेसच्या एकूण मतांच्या टक्केवारीच्या निम्मी आहे. बऱ्याच काळापासून भाजप दक्षिणेकडील राज्यांमध्ये 'उत्तर भारतीय पक्ष' मानला जात होता. सर्व प्रयत्न करूनही कर्नाटक वगळता दक्षिणेकडील राज्यांमध्ये प्रवेश करू शकला नव्हता. २०१९ मध्ये मोदी लाटेतही आंध्र प्रदेश, केरळ आणि तमिळनाडूमध्ये एकही जागा जिंकता न आल्याने भाजप दक्षिणेबाबत अधिक गंभीर झाला. तमिळनाडूच्या राजकारणात द्रविडीयन पक्षांचे पारंपरिक वर्चस्व आहे. केरळमध्ये भाजपच्या हिंदुत्वाच्या राजकारणाचाही उलटसुलट परिणाम झाला. येथे भाजपने उपस्थित केलेल्या सबरीमाला प्रकरणाचा केरळ काँग्रेसला सर्वाधिक फायदा झाला. पण या निवडणुकीत परिस्थिती बदलली. काँग्रेस सरकारने तेलंगणामधील शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन पूर्ण न केल्याचा फायदा भाजपला मिळाला. तमिळनाडूमध्ये भाजपने १९९९ मध्ये जयललिता यांच्या अण्णाद्रमुकशी युती असताना तीन जागा जिंकल्या असल्या तरी त्याच्या मतांची टक्केवारी ३.६६ होती. आता ती ११.२४ पर्यंत वाढली आहे. भाजपने द्रविड पक्षांच्या मतांचा वाटा कमी केला आहे. येथे मित्रपक्ष असणाऱ्या अण्णाद्रमुकमधील फुटीचा फायदा भाजपला झाला. आता भाजप तिथे प्रमुख विरोधी पक्षाची जागा घेऊ पाहत आहे. अर्थात राज्यातील ३९ पैकी २२ जागा जिंकणाऱ्या द्रमुकच्या मतांची टक्केवारी कमी करणे अजूनही सोपे नाही. भाजपच्या दक्षिणेतील एकूण कामगिरीवरून कोणताही राष्ट्रीय पक्ष चार धडे घेऊ शकतो. त्यातील एक म्हणजे प्रत्येक राज्याचे स्वतःचे सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक घटक असतात आणि ते मतदानावर परिणाम करतात. त्यामुळेच भाजपने दक्षिणेतील प्रत्येक राज्यात मतांची टक्केवारी आणि जिंकलेल्या जागांच्या बाबतीत परस्परविरोधी कामगिरी दाखवली आहे. दुसरा मुद्दा म्हणजे कोणताही राष्ट्रीय पक्ष दक्षिणेतील प्रादेशिक पक्षांकडे दुर्लक्ष करू शकत नाही. तेलुगु देसम आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाने हे सिद्ध केले आहे. तिसरा धडा म्हणजे विचारधारा आणि राजकीय वक्तृत्वामुळे मते मिळू शकतात; पण मतांचे रूपांतर जागांमध्ये होईल याची खात्री देता येत नाही. केरळ आणि तमिळनाडूने भाजपला ते दाखवून दिले आहे. शेवटचा धडा म्हणजे दक्षिणेकडील राजकारणात चित्रपट तारे, तारकांचा प्रभाव अजूनही कायम आहे. भाजपचे आंध्र प्रदेश आणि केरळमधील चित्रपट कलाकारांशी असलेले संबंध आणि त्यातून होणारे निवडणूक फायदे यावरून हे स्पष्ट होते. आगामी काळात भाजपच्या राजकारणासोबत दक्षिण भारतातील राजकीय समीकरणेही मोठ्या बदलासाठी सज्ज झाली आहेत. कर्नाटकमधील निवडणुका नेहमीच जातीभोवती फिरत असतात. गेल्या विधानसभा निवडणुकीत प्रबळ लिंगायत समाजातील बी. एस. येडियुरप्पांना बाजूला करण्यात आल्याचे परिणाम भाजपला भोगावे लागले. त्यापासून धडा घेत पक्षाने येडियुरप्पा यांना पुन्हा सन्मान दिला. लोकसभा निवडणुकीत पक्षाला याचा फायदा झाला. सर्वोच्च वर्ग आणि शहरी लोकसभा मतदारसंघामध्ये भाजपने अधिक मतांच्या फरकाने विजय मिळवला आहे. कर्नाटकच्या किनारी भागात भाजपला धर्माच्या आधारावर व्होट बँकेचे ध्रुवीकरण करता आले. इथे लोक जातीच्या आधारावर मतदान करायचे. मात्र दक्षिणेत धार्मिक ध्रुवीकरण होणे प्रादेशिक पक्ष आणि काँग्रेससाठी हानीकारक ठरेल तर भाजप फायदा घेऊ शकेल.

**आजकाल**

# संविधान बदल हा भाजपचा छुपा अजेंडा

**तुषार गायकवाड**

भाजपा संविधान बदलणार म्हणून अपप्रचार करणारे विरोधक भाजपाचेच नेते कसे काय?

राज्यातील महायुतीचे अर्धे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात, विरोधकांनी 'भाजपा संविधान बदलणार' असा अपप्रचार केल्याने भाजपाची पिछेहाट झाली. याचा अर्थ फडणवीसांच्या मते, भाजपा नेते अनंतकुमार हेगडे, ज्योती मिर्धा, लल्लू सिंह व अरुण गोविल हे सर्व विरोधक आहेत. यांनी अपप्रचार केल्यामुळे भाजपाची पिछेहाट झाली.

९ मार्च २०२४ रोजी कर्नाटकमधील उत्तर कन्नड जिल्ह्यात सिद्धपूर येथे एका सभेत बोलत असताना भाजपाचे तत्कालीन खासदार अनंतकुमार हेगडे म्हणाले की, 'आपल्याला संविधानात बदल करावे लागणार आहेत. संविधानात बदल हवे असतील तर दोन तृतीयांश बहुमताशिवाय पर्याय नाही.'

या वक्तव्यामुळे भाजपाने फक्त अनंतकुमार हेगडे यांचे लोकसभेचे तिकीट कापले. बाकी कारवाई शून्य! हे भाजपाचे, मोदींचे संविधान प्रेम!! मोदींनी हेगडे वरती कारवाई करण्याचे सोडून इंडिया आघाडीला संविधान बदलण्यासाठी सत्ता हवीय अशा चोराच्या उलट्या बोंबा मारल्या.

३० मार्च २०२४ रोजी राजस्थानच्या नागौर येथे जाहीर प्रचार सभेत भाजपाच्या नागौर लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार ज्योती मिर्धा यांनी संविधान बदलावर बोलताना म्हटले की, 'देशहितासाठी अनेक कठोर निर्णय घ्यावे लागतात. त्यासाठी संविधानात बदल करावे लागतात. जर संविधानात काही बदल करायचे असतील तर तुमच्यापैकी अनेक लोकांना माहीत आहेच की, दोन्ही सभागृहात म्हणजेच लोकसभा आणि राज्यसभेत बहुमत असणे आवश्यक आहे.' या वक्तव्यानंतर भाजपा कडून ज्योती मिर्धा यांचेवर काहीही कारवाई झाली नाही.

१४ एप्रिल २०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिवशी उत्तर प्रदेशच्या अयोध्या / फैजाबाद लोकसभा मतदारसंघाचे तत्कालीन खासदार आणि भाजपाचे लोकसभा उमेदवार लल्लू सिंह यांनी जाहीर प्रचारसभेत म्हटले, 'सरकार तर २७२ सीट्स मिळाल्यावर तयार होते. मात्र संविधान बदलण्यासाठी किंवा घटनादुरुस्त्या करण्यासाठी दोन तृतीयांश सीट्सची आवश्यकता लोकसभेत असते. म्हणून भाजपला ४०० जागा हव्यात.'

लल्लू सिंह लहानपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सदस्य आहेत. विद्यार्थी दशेत असताना लल्लू सिंह अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे नेतृत्व करायचे. याशिवाय बजरंग दल आणि भाजपा मध्ये लल्लू सिंह यांनी अनेक पदे भूषवलेली आहेत. संविधान बदलाच्या लल्लू सिंह यांच्या वक्तव्यानंतर भाजपा किंवा मोदींनी त्यांचेवर शून्य कारवाई केली.

४ जून रोजी भारतीय मतदारांनी भाजपाच्या बहुमताची कवचकुंडले काढून घेतल्याचे समजल्यानंतर उत्तर प्रदेश सरकारचे विद्यमान कॅबिनेट मंत्री आशीष पटेल यांनी लल्लू सिंह यांच्या संविधान बदलण्याच्या वक्तव्याने भाजपाची पिछेहाट झाल्याचे जाहीरपणे कबूल केले.

१५ एप्रिल २०२४ रोजी उत्तर प्रदेशच्या मेरठ लोकसभा मतदार संघाचे भाजपाचे उमेदवार रामायण मालिकेत रामाची भूमिका करणारे अरुण गोविल यांनी संविधानावर मुक्ताफळे उधळताना म्हटले की, 'संविधान जेव्हा तयार केले तेव्हाची परिस्थिती वेगळी होती. कोणताही बदल करणे प्रगतीचे प्रतिक असते. त्यात काहीच चुकीचे नाही. संविधान एका व्यक्तीच्या निर्णयाने बदलत नाही. सभागृहात सर्वांची संम्मती मिळाली तर अवश्य बदल केला जाईल.'

अरुण गोविल भाजपाचे विद्यमान नवनिर्वाचित लोकसभा सदस्य आहेत. त्यांचे संविधान बदलण्याचे वक्तव्याबाबत भाजपा किंवा मोदींनी त्यांचेवर शून्य कारवाई केली. आता पराभवाचे विश्लेषण करताना फडणवीस म्हणतात की, भाजपा संविधान बदलणार म्हणत विरोधकांनी अपप्रचार केल्यामुळे भाजपाची पिछेहाट झाली.

आता जनतेनं ठरवायचं की, अनंतकुमार हेगडे, ज्योती मिर्धा, लल्लू सिंह व अरुण गोविल हे सर्व विरोधक आहेत का? फडणवीस अजूनही राज्यातील मतदारांना मूर्ख समजत असून 'नाक कापलं तर भोक शिल्लक आहे' अशा अर्विभावात आहेत. ही घमेंडदेखील आगामी विधानसभा निवडणूकीत महाराष्ट्र उतरेल यात शंकाच नाही!!

**लोकसंसद**

### महाकाय भीतीदायक होर्डिंगना आळा बसेल?

मुंबईच्या घाटकोपर येथील छेडानगर येथे उभारलेले बेकायदा महाकाय होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेत १७ जणांचा नाहक बळी गेल्यानंतर राज्य सरकार, मुंबई महापालिका, म्हाडा प्राधिकरण अशा सर्वांचेच डोळे खाडकन उघडले आणि तेथील प्रशासकीय यंत्रणांना खडबडून जाग आली. या दुर्घटनेनंतर मुंबईतील अनधिकृत होर्डिंगवर तात्काळ कारवाईचे करण्याचे आदेश पालिकेने दिले. तसेच रेल्वे प्रशासनाला डिझास्टर ॲक्टखाली रेल्वे हद्दीमधील धोकादायक होर्डिंग तात्काळ हटविण्यासाठी पालिकेने नोटीस बजावली. होर्डिंगबाबत मुंबई महापालिका आता नवीन पॉलिसी आणणार असून नव्या पॉलिसीनुसार इमारतींवर होर्डिंग लावण्यास बंदी घालण्यात येणार आहे. दरम्यान म्हाडा प्राधिकरणाने म्हाडाच्या जमिनीवरील बेकायदेशीर होर्डिंग तत्काळ हटविण्याचे फर्मान काढले आहे. दुसरीकडे अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी राज्य सरकार ॲलर्ट मोडवर आले असून राज्यात लागणाऱ्या होर्डिंगसाठी यापुढे राज्य सरकारकडून परवानगी घेणे अनिवार्य होणार आहे. शासकीय यंत्रणांचे हे सर्व आदेश, नियम, फतवे प्रत्यक्षात अंमलात येतील आणि लवकरच शहरातील बेकायदा महाकाय भीतीदायक होर्डिंगना आळा बसेल अशी आशा आहे.

**- प्रदीप मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१५ जून**

**१८४७:-** अनुवादक नाटककार कृष्णाजी परशुराम गाडगीळ यांचा जन्म. 'फटफजितीचा कळस' या नाटकासह अनेक अनुवादीत साहित्य आणि कविता त्यांच्या नावावर आहेत. **१८९८:-** कथाकार, निबंधकार, गीतेचे अभ्यासक डॉ.गजानन श्रीपाद खैर यांचा जन्म. 'गीता विकास-समतोल जीवनाचे दर्शन' हा गीतेच्या तत्त्वज्ञानाचे विवरण करणारा ग्रंथ तसेच 'बालगंड' ही बालकथा आणि काही अनुवादीत साहित्य त्यांच्या नावावर आहे. **१९०६:-** बर्ट्रांड रसेलच्या 'मॅरेंज अँड मॉरल्स' आधारे 'विवाह आणि नीती' तसेच 'इब्सेन :व्यक्ती आणि वाङ्:मय' तसेच 'मराठी वाङ्:मयाचा परामर्श : आरंभापासून १८७४ पर्यंत' व 'ग्रंथांच्या सहवासात' (ग्रंथसमीक्षा) अशी पुस्तके लिहिणारे गंगाधर भाऊराव निरंतर यांचा जन्म. 'गृहिणी', 'अर्धांगी', 'भूकंप' या कादंबऱ्याही त्यांनी लिहिल्या होत्या. **१९०७:-** समाजवादी नेते, स्वातंत्र्यसेनानी, लेखक नारायण गणेश गोरे उर्फ नानासाहेब यांचा जन्म. 'कारागृहाच्या भिंती' ह्या दैनंदिनी वजा पुस्तकांसह 'सीतेचे पोहे', 'डाली', 'शंख आणि शिंपले', 'समाजवादच का? आणि पं.नेहरुंच्या आत्मचरित्राचे भाषांतर मिळून २५ पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९१३:-** लेखक, शिक्षणतज्ज्ञ प्रा. रामचंद्र नामदेव झोळ यांचा जन्म. 'रामप्रहर' या आत्मचरित्रासह त्यांनी 'शेक्सपिअरच्या नाट्यछटा' हे पुस्तक लिहिले. याशिवाय शिक्षणशास्त्र व मानसशास्त्र या विषयांवर त्यांनी मोठ्या प्रमाणावर लेखन केले. **१९२३:-** मराठीसह इंग्रजीमध्येही विपूल प्रमाणत लेखन करणारे लेखक, कथाकार शांताराम (के. ज. पुरोहित) यांचा जन्म. 'संत्र्याची बाग', 'धर्म', 'खाटा', 'छळ', 'चेटूक', 'अंधारवाट' तसेच 'सफरनामा' हे प्रवासवर्णन मिळून ३० हून अधिक पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९२५:-** लेखक संत तुकारामांचे चिकित्सक अभ्यासक प्रभाकर रामकृष्ण भांडारकर यांचे निधन. त्यांची धर्मावरील व्याख्याने, कीर्तने, प्रवचने यांमधून त्यांच्या मराठी व इंग्रजी काव्याच्या गाढया व्यासंगाची कल्पना येते. **१९२६:-** 'स्वरगंगेच्या काठावरती वचन दिले तू मला...', 'शतकांच्या यज्ञातून उठली एक केसरी ज्वाला' अशा मोजक्याच पण अजरामर शब्दरचनांनी मराठी काव्य रसिकांवर अनेक दशके गारुड करणारे मराठी कवितेच्या पालकीचे भोई कवी, कथाकार शंकर विनायक वैद्य यांचा जन्म. 'कालस्वर' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह, त्यानंतर तब्बल २७ वर्षांनी 'दर्शन' हा काव्यसंग्रह प्रसिध्द. या दरम्यान अनेक मासिके व विशेषांकातून त्यांनी काव्यलेखन केले. मराठी साहित्य वर्तुळात 'सर' या नावाने परिचित असणाऱ्या प्रा. वैद्यांनी संत ज्ञाने-वर ते संत तुकाराम आणि कवी मर्ढेकर ते केशवसूत यांच्यावर त्यांनी समीक्षात्मक लेखन आणि व्याख्यानही केले. **१९३१:-** चरित्रपर नाटके (स्वामी विवेकानंद, 'ताई तेलीण', 'मस्तानी', 'चांदबीबी) हा नवा प्रकार हाताळणारे 'संदेशचे संपादक अच्युत बळवंत कोल्हटकर यांचे निधन. **१९३४:-** कथा-कादंबरीकार अनंत दत्तात्रय तिंबिले यांचा जन्म. २९१ कादंबऱ्या आणि २५० रहस्य कथा त्यांच्या नावावर आहेत. त्यांच्या काही कादंबऱ्यावर चित्रपटही निघाले. **१९४२:-** मराठवाड्यात सर्वप्रथम प्रतिनिधिक कवितासंग्रहाची सुरुवात करणारे साहित्यिक ना. मा तिडके यांचा जन्म. **१९४३:-** लेखक दत्ता जाधव यांचा जन्म. यांच्या साहित्य संपदेत 'राग रंग' रागदारीवर आधारित, 'फूल मेंदीचे' मराठी गझल, 'कोडगा' डॉ. बाबासाहेब आंबेडकरी यांच्या संबंधीचा काव्यसंग्रह यात गझल, कविता व मुक्त छदांचा अंतर्भाव आहे. **१९४५:-** कवी, आंबेडकरी विचारप्रवाहाचे अभ्यासक व कथाकार अर्जुन उमाजी डांगळे यांचा जन्म. 'छावणी हलत आहे' हा त्यांचा काव्यसंग्रह दलित, सर्वहारा जाणिवांचा होता. 'उद्ध्वस्त क्षितिजे', 'बांधावरची माणसे' हे कथासंग्रह, 'यादवी' ही कादंबरी, तसेच 'दलित साहित्य : एक अभ्यास','दलित विद्रोही' आणि 'आंबेडकरी चळवळीचे अंतरंग' ही त्यांची वैचारिक पुस्तके. **१९४५:-** लेखक प्रा. कैलास मुक्तागिरी बोंबार्डे यांचा जन्म. 'लोकसंख्या शिक्षण' आणि 'शास्त्र अध्यापन पध्दती' हा शिक्षणशास्त्र विषयक ग्रंथ त्यांचा प्रसिध्द. **१९४५:-** लेखक गणपत दत्तात्रय चव्हाण यांचा जन्म. ह्यांची 'प्रेमिकांचा विजय होवो', 'रामकृष्ण हरी', 'शब्द शब्द मृत्युंजय', 'सावरकर' आदी नाटके त्यांनी लिहिली असून काही पुस्तके त्यांनी प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. **१९४६:-** कथा-कादंबरी लेखक आणि कोकाटे हमखास इंग्लिश या गाजलेल्या पुस्तकाचे लेखक महादेव तुकाराम कोकाटे यांचा जन्म. यांची 'अगतिक', 'आक्रोश', 'प्रतिक्षा' या कादंबऱ्या प्रसिध्द झाल्या आहेत. **१९४७:-** नाटककार, कवी, कथा - कादंबरीकार प्रेमानंद गज्वी तथा आनंद शंकर गजमिये यांचा जन्म. 'देवनवरी', 'जय जय रघुवीर समर्थ','दी बुध्दा', 'पांढरा बुधवार', 'नूरमहम्मद साठे' मिळून १३ नाटके, 'एकतारी' हा काव्यसंग्रह, 'लागण', 'ढीवर' या कथा, 'जागर' ही कादंबरी तसेच 'प्रेमानंद द गज्वी' यांचा लेखन प्रवास, 'प्रेमानंद गज्वी समग्र एकांकिका', 'अंकएकांक' हे एकांकिका समीक्षा अशी साहित्य संपदा. **१९८५:-** मराठी लावण्यांचे संग्राहक बापूसाहेब जिंतीकर यांचे निधन. **२०१३:-** 'दैनिक सकाळ' मधील 'चिंटू' या चित्रमालिकेचे निर्माते प्रभाकर वाडेकर यांचे निधन. मिस्किल स्वभाव आणि उत्तम विनोदबुद्धी असलेल्या वाडेकरांचे 'खवय्येगिरी' या नावाचे खुसखुशीत स्तंभलेखन गाजले.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

# कशेळे-खांडस रस्त्यावर पुलाचे काम अर्धवट

## पावसाने खांडससह काही ग्रामस्थांचा रस्ता अडवला

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्याचे शेवटचे टोक असलेल्या खांडस या मोठ्या लोकवस्तीच्या गावात जाण्यासाठी एकमेव रस्ता आहे. मात्र, त्या कशेळे-खांडस रस्त्यावरील लहान पुलाचे बांधकाम अपूर्णावस्थेत आहे. एप्रिल महिन्यात पुलाचे बांधकाम सुरु केल्यानंतर तात्पुरत्या स्वरूपात स्थानिक वाहनांसाठी नाल्यातून मार्ग देण्यात आला होता. मात्र, १३ जून रोजी खांडस भागात प्रचंड पाऊस झाल्याने खांडस-कशेळे राज्यमार्ग या रस्त्यावर असलेला नाला भरून वाहू लागला आहे. त्यामुळे खांडस, अंभेरपाडा, काठेवाडीवासियांचा मार्ग बंद झाला आहे. दरम्यान, या भागात जाण्यासाठी अन्य कोणताही पर्यायी मार्ग नाही. दरम्यान, स्थानिकांचा येण्या-जाण्याचा मार्ग बंद झाला असताना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या पुलाच्या कामाचा ठेका घेणाऱ्या ठेकेदारावर कोणतीही कारवाई होताना दिसत नाही.



कशेळे-खांडस रस्त्याने खांडस गावात जावे लागते. त्या गावाच्या मागील बाजूस काठेवाडी आणि अंभेरपाडा तसेच भीमाशंकर गणेश घाट आदी भाग आहे. या रस्त्यावर असलेल्या खांडस गावाची लोकसंख्या मोठी असून, दररोज ये-जा या रस्त्याने असते. या रस्त्यावर खांडस गावाच्या अलीकडे असलेल्या नाल्यावरील लहान पूल बांधण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याने त्या पुलासाठी ३४ लाखांची तरतूद अर्थ संकल्पात केली आहे.एप्रिल महिन्यात या पुलाच्या कामाला सुरुवात झाली. मात्र, जून महिन्याची १५ तारीख आली तरी पुलाचे काम पूर्ण झालेले नाही. पुलाचे बांधकाम सुरु झाल्यानंतर ठेकेदाराने खांडस गावातील ग्रामस्थांना येण्या जाण्यासाठी नाल्यातून मार्ग तयार करून दिला. त्या पर्यायी रस्त्याने दोन महिने वाहतूक सुरु होती. कोकणात साधारण सात जूनपर्यंत पाऊस येत असतो आणि त्यामुळे जूनपूर्वी ही सर्व कामे पूर्ण करून घेणे बांधकाम खात्याची जबाबदारी होती. मात्र, वेळेत पुलाचे काम पूर्ण झाले नसल्याने ग्रामस्थांची पावसाने तारांबळ उडविली आहे. गेली काही दिवस दररोज पाऊस या भागात येत असतो.

मात्र, मागील दोन महिन्यांहून अधिक काळात पुलाचे बांधकाम पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून स्थानिक ठेकेदाराला कोणत्याही प्रकारची घाई करण्याची सूचना दिल्या जात नाहीत. त्यामुळे १३ जून रोजी झालेल्या पावसामुळे खांडस गावाच्या बाहेरून वाहणारा नाला तुडुंब भरून वाहू लागला. त्याचवेळी डोंगरात मोठा पाऊस झाल्याने कशेळे येथून निघालेले खांडस ग्रामस्थ नाला भरून वाहात असल्याने घरी पोहोचले नाहीत. काल दुपारपासून खांडस ग्रामस्थांना आपली वाहने गावाच्या बाहेर पुलाच्या पलीकडे उभी करून ठेवावी लागत आहेत.

दरम्यान, बांधकाम विभागाच्या चुकीच्या नियोजनामुळे आणि ठेकेदारावर वेळेत काम पूर्ण करण्याची बंधने ठेवण्यात आली नसल्याने पुलाचे बांधकाम वेळेत पूर्ण झाले नाहीत आणि पूलदेखील वेळेत खुला झालेला नाही. त्याबद्दल स्थानिक ग्रामपंचायत सदस्य बाळा भोईर यांनी नाराजी व्यक्त केली असून, खांडस ग्रामस्थ आणि अन्य काही गावातील ग्रामस्थ यांना पुलाच्या अर्धवट कामामुळे घरी जाताना अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे बांधकाम विभागाने त्या ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

# चंद्रकांत कापरे यांचे निधन

**। म्हसळा । वार्ताहर ।**



राष्ट्रवादी काँग्रेस म्हसळा उपशहराध्यक्ष चंद्रकांत कापरे यांचे दि. १४ जून रोजी पहाटे ६ वाजताच्या दरम्यान हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. निधनसमयी ते ५२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, मुलगा, मुलगी आणि मोठा मित्रपरिवार आहे. चंद्रकांत कापरे हे मूळचे उस्मानाबाद येथील बारशी तालुक्यातील रहिवासी असून, ते ३० वर्षांपूर्वी म्हसळा शहरात व्यवसाय करण्याच्या उद्देशाने आले होते. त्यांच्या मृत्यूची बातमी समजताच म्हसळा तालुक्यात शोककळा पसरली आहे.

**महाराष्ट्र सागरी मंडळाकडून पुरविण्यात येणारी महत्वपूर्ण सेवा**

महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई, गृह (बंदरे व परिवहन) विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून महाराष्ट्र राज्याच्या पश्चिम किनारपट्टीवरील जिल्हा प्राधिकरणांना तसेच प्रमुख लहान बंदरांच्या बंदर हद्दीत कार्यरत असलेले बंदर चालक, सागरी पायाभूत सुविधा पुरविणारे विकासक आणि राज्यात कार्यरत असलेल्या इतर विविध संशोधन संस्थांना राज्याच्या पश्चिम किनारपट्टीवर आणि खाड्यांमध्ये विखुरलेल्या विविध ठिकाणच्या वार्षिक भरती-ओहोटीचा अंदाजीत स्वरूपाची माहिती पुरवत आहे.

समुद्रकिनाऱ्यावरील शहरे आणि जिल्ह्यांमध्ये पावसाळी हंगामामध्ये देशाच्या नैसर्गिक आपत्ती पूर, वादळ आणि चक्रीवादळ इत्यादी यांसारख्या आपत्तींचे नियोजन आणि व्यवस्थापन तसेच कोणत्याही सागरी पायाभूत सुविधांच्या नियोजन आणि अंमलबजावणीसाठी ही भरती- ओहोटीची माहिती अतिशय महत्त्वाची आहे. त्यानुसार नागरिकांना प्रकाशित पुस्तकाच्या स्वरूपात ही माहिती राज्य सरकारच्या ''aaplesarkar.mahaonline.gov.in'' या संकेत स्थळावर मिळवता येईल.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१५ जून**

१) श्री. केशव रामचंद्र पाटील
पोयनाड, अलिबाग, १५-६-१९३४
२) श्री. महादेव गणपत म्हात्रे
पोयनाड, अलिबाग, १५-६-१९४१
३) श्रीम. सरिता शांताराम पाटील
चेंढरे, अलिबाग, १५-६-१९४०
४) श्री. दत्ताराम भास्कर म्हात्रे
अलिबाग, १५-६-१९४६
५) श्री. गजानन शंकर पोपट
चेंढरे, अलिबाग, १५-६-१९५३
६) संदीप पुरूषोत्तम शहा
अलिबाग, १५-६-१९६०
७) श्री. विजय बबन भगत
अलिबाग, १५-६-१९६२
८) श्री. मंगेश पद्मनाथ मयेकर
अलिबाग, १५-६-१९६४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयातदाखलअसलेल्यारुग्णांच्याएकानातेवाईकालाजेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**नुही जूनैद घट्टे, वाढदिवस अलिबाग**



**डॉ. श्री. रवींद्र म्हात्रे, वाढदिवस, कार्लेखिंड, अलिबाग**

# आंतरराष्ट्रीय रेफ्री सेमिनारसाठी तुषार सिनलकरची निवड

**। रसायनी । वार्ताहर ।**

मलेशिया येथे होणाऱ्या क्युरोगी आणि पुमसे आंतरराष्ट्रीय रेफ्री सेमिनारमध्ये भाग घेण्यासाठी तुषार सिनलकर यांची निवड झाली आहे. तुषार यांचा तायक्वांदोमधील प्रवास प्रेरणादायी आहे. गेल्या काही वर्षांमध्ये त्यांनी ३० हून अधिक राष्ट्रीय खेळाडू आणि ४ आंतरराष्ट्रीय खेळाडूंना यशस्वीरित्या प्रशिक्षण दिले आहे. त्यांचे मार्गदर्शन केले व त्यांनी त्यांचे प्रशिक्षण कौशल्य प्रदर्शित केले आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रशिक्षकाची भूमिका त्यांनी यापूर्वीच बजावली आहे आहे. याव्यतिरिक्त, भारतीय क्रीडा प्राधिकरणाद्वारे त्याच्या खेळाडूंची निवड त्याच्या मार्गदर्शनाची गुणवत्ता आणि प्रभाव अधोरेखित करते. या उत्कृष्ट कामगिरीसाठी इंडिया तायक्वांदोचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर, सर्व जिल्हा संघटनांनी तुषार सिनलकर यांचे अभिनंदन करीत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# जगदीश पाटील यांना पत्नीशोक

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील रांजणपाडा आणि शिवकर (पनवेल) येथील भातगिरणी मालक जगदीश दशरथ पाटील यांच्या सुविद्य पत्नी सरिता पाटील यांचे वयाच्या ५८ वर्षी अल्पशा आजाराने मंगळवार, दि. ११ जून रोजी मुंबई येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन सुना, तीन नातवंडे, तीन दिर, तीन भावजया, दोन नणंदा असा परिवार आहे.त्यांच्या अत्यंयात्रेस असंख्य जनसमुदाय, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील नेतेमंडळी उपस्थित होती. कै. सरिता पाटील यांचा होमविधी सोमवार, दि. १७ जून रोजी रांजणपाडा, उरण येथे होणार आहे. तर दशक्रिया विधी गुरुवार, दि. २० जून रोजी नाशिक येथे होणार आहे. तर तेरावा विधी रविवार, दि. २३ जून रोजी रांजणपाडा येथे होणार आहे.



**राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)
प्रशासकीय इमारत, चेंबूर, मुंबई - 400074
CIN-L24110MH1978GOI020185
**जाहिरात क्र. 02062024**

**ट्रॉम्बे/थळ मध्ये भरती**

राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ लिमिटेड) ही खते आणि औद्योगिक रसायनांचे उत्पादन आणि विपणन व्यवसायातील एक अग्रणीय नफा कमवणारी कंपनी आहे. ज्याचा एकूण व्यवसाय सुमारे रु. 21451.54 कोटी आहे. कंपनीला ऑगस्ट 2023 मध्ये प्रतिष्ठित ''नवरत्न'' दर्जा प्रदान करण्यात आला आहे. राष्ट्रीय स्तरावरील विपणन नेटवर्कसह त्यांची उत्पादन युनिटे महाराष्ट्र (ट्रॉम्बे चेंबूर, मुंबई आणि थळ, जिल्हा-रायगड) मध्ये आहेत. कंपनी उत्कृष्ट करियर विकास संधी प्रदान करते. कंपनी खालील पदांची भरती करू इच्छित आहे:

| अनु. क्र. | पद कोड | शाखा व पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | JRFIREA3/02062024 | कनिष्ठ फायरमन श्रेणी-II (A3) | 10 |

इच्छुक उमेदवारांनी अधिक माहितीसाठी कंपनीची वेबसाइट www.rcfltd.com वरील 'रिक्रूटमेंट' सेक्शन पहावे.
**मुख्य महा व्यवस्थापक (मा.सं.)**
समृध्दिची एकत्र वाटचाल

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000031554**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-25/ 2024-2025.**<br>Rfx e-tender for work of monkey patrolling with top video shooting of 220kV & 100kV Critical lines under EHV Lines S/Dn Panvel under EHV (O&M) Division Panvel.<br>**Tender amount Limited to Rs. 25,00,000/-,**<br>**EMD amount Rs. 25,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **14.06.2024, 18:00 Hrs. to 23.06.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 23.06.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **24.06.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.
**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

# दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार

**। मुरूड । वार्ताहर ।**

हिंदू एज्युकेशन सोसायटी संचलित ओंकार विद्या मंदीर विद्यालयाच्या मार्च २०२४ च्या एसएससीचा सेमी इंग्रजीचा निकाल १०० टक्के लागला असून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा संस्थेतर्फे प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी हिंदू एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त मनोहर गुरव, मृदुला आबदेव, दीपाली जोशी, म निषा फाटक, सचिव सुनील विरकुड, मुख्याध्यापिका प्रविता गार्डी पालक व शिक्षक वृंद उपस्थित होते.

यामध्ये प्रथम क्रमांक रुद्राणी हेरंब जोशी ७८.८० टक्के, द्वितीय क्रमांक सार्थक संदीप ठाकूर ७७.६० टक्के, तृतीय क्रमांक आर्या सुनील बनिया ७०.४० यांचा समावेश आहे. यावेळी दीपाली जोशी, मनोहर गुरव, मनिषा फाटक मुख्याध्यापिका प्रविता गार्डी यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून उच्च शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

**-: जाहीर नोटीस :-**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यांत येते की, :-

मौजे सुरई, ता. मुरुड, जिल्हा रायगड येथील खालीलप्रमाणे हक्क नोटीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी संबंधित कब्जेदार १) यास्मीन अताउल्ला घये, २) झेनब अताउल्ला घये, ३) हबीब अताउल्ला घये, ४) मोमिना अताउल्ला घये, ५) मुहिबुल्ला अताउल्ला घये यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

| गट नं. | खाते नं. | एकूण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. | गांव |
|---|---|---|---|---|
| १२/१ पैकी | १६२ | ला.ला. १-९६-०४<br>पो. ख. ०-७३-६०<br>एकूण २-६९-६४ | २-४२ | सुरई, ता. मुरूड |

सबब सदर वरील वर्णनाच्या जमीन मिळकतींपैकी संबंधीत कब्जेदार यांचे मालकी, हिश्श्याची क्षेत्र २-६९-६४ हे. आर. पॉ. या जमीन मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तकारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात, याप्रमाणे कोणाचीही, कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजाविरहित व खरेदी घेण्यास योग्य आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत, असे समजण्यात येईल हे सर्व लोकांस कळावे.

ठिकाण :- मुरूड-जंजिरा.
दिनांक : १४/०६/२०२४

सही/-
**अन्वर ए. हुसेन**
ॲडव्होकेट
रा. एस. टी. डेपो जवळ, दत्तमंदिर रोड,
मुरूड-जंजिरा, जि. रायगड

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. कोठींबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. हरदाससिंग लक्ष्मणसिंग खेमानी यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे-आर-पॉ) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| ८८ | ३ अ | १-९४-० | १-३५ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक १५/०६/२०२४

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस- कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्धारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनकडून आमचे अशिल सौ. रंजना राम भोईर, श्री. समीर राम भोईर, श्री. राजेश राम भोईर, ह्यांनी कायमचे खरेदीखताद्धारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या राबपड जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मौजे :- बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत :-**

| मालकांचे नाव | स.नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. प्रति | आकार |
|---|---|---|---|
| श्री. अशोक तुकाराम निमणे, | ११/३ | एकूण:- ०-०९-७० | ०.११ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता : लक्ष्मी अपार्टमेंट,
सदनिका क्र. १०८ पहिला मजला,
शेलु स्टेशन जवळ (पु), बांधिवली,
ता. कर्जत, जि. रायगड.
ठिकाण : कर्जत

सही/-
**ॲड. सूर्यकांत भाऊ मसणे,**
दिनांक: १५/०६/२०२४
मो.नं. ९९२२१५५१५३

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतीचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. |
|---|---|---|---|
| हेलन एच. चेन | ३२ | ३/ब | ०-४३-०० |
| | ३३ | ६/अ | ०-४५-८० |
| १) निकोलस सिंचु चेन<br>२) हुईलिंग सिंचु चेन<br>३) निलनियुआन सिंचु चेन | ४३ | १/ब | ०-५३-१० |

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताचेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकांबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १५/०६/२०२४

**ॲड. सी. बी. ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१०२०१

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. दिपक शंकर सकपाळ उर्फ उतेकर यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३७ | ४ ब | ०-२७-६० | ३=०६ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : १५/०४/२०२४

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४, ९२७१८६९२०२

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे आशिलाने विकत घेण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे- कळंब, ता. सुधागड, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत.**
**मिळकतीचे वर्णन**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. सुरज पांडुरंग शिरोडकर | १०/ब/प्लॉट नं./६ | ४.४६.५० (४४६ चौ.मी.) | ४४.६० |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.
दिनांक :- १५/०६/२०२४

खरेदी घेणार
श्रीम. उर्वशी दिलीप पांचाल.
रा. विले पार्ले वेस्ट मुंबई. ४०००५६
मो. नं. ९९३००६२४१७

खरेदीदारांचे वकील,
**ॲड. सौ. मिनल निलेश मनोहर**
बी. कॉम.एल.एल.एम.एससी.(ईएनव्ही)...
डी. सी. एल.
ॲडव्होकेट ॲन्ड नोटरी
मधुबन मु.रोट, ता. रोहा, जि. रायगड.
मो.९२७१५३३५६७/९१३०९३३५६७

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. रविंद्र जयवंत देशपांडे व श्रीमती शितल श्रीकांत वागळे रा. किहीम यांचे मालकीची मौजे किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत असून त्यामध्ये किहीम ग्रामपंचायत घर नं. ४०८ चे घर आहे. सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड**

| भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | पो.ख (हे.आर.चौ.मी) | आकारणी (रू. पै) |
|---|---|---|---|
| ३२२ नवीन नं. ७२२ | १.८७.५० | ०.४०.०० | १६.७० |


सदर मिळकतीबाबत आमचे अशिलांनी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात श्री. रामचंद्र निलकंठ होनगाडू वगैरे ५ जणांविरूद्ध टेनन्सी न्यायालयामध्ये अपिल दाखल केले असून सदरचे काम न्यायप्रविष्ठ आहे. ७/१२ सदरी श्री. रामचंद्र निलकंठ होनगाडू वगैरे ५ जणांची नावे असल्यामुळे ते सदरची मिळकत परस्पर विकण्याच्या प्रयत्नात असल्याचे आमचे अशिलांच्या निदर्शनास आले आहे. सदर मिळकतीची मालकी व ताबेकब्जा वहिवाट आमचे अशिलांकडे आहे. तसेच सदर मिळकतीत असलेले घर देखील आमचे अशिलांच्या मालकीचे व ताबेकब्जा वहिवाटीतील आहे. तसेच सदर घर ग्रामपंचायत दप्तरी आमचे अशिलांचे वडील कै. जयवंत मंगेश देशपांडे व त्यांचे बंधू यशवंत मंगेश देशपांडे यांचे नावे दाखल आहे. त्याची घरपट्टी देखील आमचे अशिलांनी आजतागायत भरलेली आहे. त्यामुळे सदर मिळकतीबाबत व घराबाबत कोणीही श्री. रामचंद्र निलकंठ होनगाडू वगैरे ५ यांचेशी मिळकत विक्रीबाबत करार, मदार, खरेदीखत, किंवा अन्य कोणताही व्यवहार करू नये. अशाप्रकारे काही व्यवहार झाल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
ता. १४/०६/२०२४

सही/-
**ॲड. शिरीष पद्माकर लेले**
'श्रीकृपा', भाऊ साहेब लेले चौक,
जुन्या नगरपालिकेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## निवडक

### गिल मायदेशी परतणार

**नवी दिल्ली:** टी २० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाची आत्तापर्यंतची कामगिरी चांगली झाली आहे. भारताने पहिल्या फेरीतील पहिले तिन्ही सामने जिंकले आहेत. त्यामुळे सुपर-८ मधील स्थानही पक्के केले आहे. सध्या भारतीय संघाबरोबर असलेले शुभमन गिल आणि आवेश खान हे दोन खेळाडू मायदेशी परतण्याची शक्यता आहे. भारताने पहिले तिन्ही सामने न्युयॉर्कला झाले. त्यानंतर आता पहिल्या फेरीतील अखेरचा सामना कॅनडा विरुद्ध फ्लोरिडाला होणार आहे.

### नसीमसाठी अभिनेत्री मैदानात

**लाहोर :** नसीम शहाच्या समर्थनार्थ अभिनेत्री कुब्रा खान म्हणाली की, मी नसीम शाहला पाहून क्रिकेट पाहायला सुरुवात केली. त्याच्या अप्रतिम गोलंदाजीमुळे मला क्रिकेटची आवड लागली. तो एक चांगला खेळाडू आहे. त्याने ट्वेंटी-२० विश्वचषकात भारताविरूद्धच्या सामन्यात शानदार कामगिरी केली. तो कौतुकास पात्र आहे पण दुर्दैवाने काहीजण त्याला लक्ष्य करत आहेत. संघाने चांगला खेळ करून देखील टीकाकारांचा सामना करावा लागत आहे हे दुर्दैव आहे.

### युसूफ पठाण अडचणीत

**वडोदरा :** क्रिकेटपटू ते लोकसभा सदस्य असा प्रवास करणाऱ्या युसूफ पठाणच्या अडचणीत वाढ झाली आहे. पश्चिम बंगालमधील बहरामपूर लोकसभा जागेवरून तृणमूल काँग्रेसच्या तिकिटावर खासदार होण्याचा मान पटकावला. पण, गुजरातमधील सरकारी भूखंडावर कब्जा केल्याप्रकरणी युसूफ पठाणला नोटीस पाठवण्यात आली आहे. वडोदरा महानगरपालिकेने युसूफ पठाणला नोटीस बजावून सरकारी जमिनीवरील अतिक्रमण काढण्यास सांगितले आहे.

### 'भारत-पाक क्रिकेट रद्द करा'

**मुंबई :** काही दिवसांपूर्वीच जम्मू-काश्मीर येथे भाविकांच्या बसवर झालेल्या आतंकवादी हल्ल्याचा निषेध करत उद्धवसेनेकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पत्राद्वारे भारत-पाकिस्तान क्रिकेट सामने रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. भारताने ९ जूनला टी-२० विश्वचषकात प्रतिस्पर्धी पाकिस्तानला नमवले होते. मात्र, स्पर्धेतील पुढील टप्प्यात जर दोन्ही संघ पुन्हा आमने-सामने आले, तर हा सामना रद्द करावा, अशी मागणी करण्यात आल्याची माहिती उद्धवसेनेचे प्रवक्ते आनंद दुबे यांनी दिली.

### नदालची विम्बल्डनमधून माघार

**लंडन :** स्पेनचा आघाडीचा टेनिसपटू राफेल नदालने यावर्षीच्या विम्बल्डन स्पर्धेत खेळणार नसल्याचे जाहीर केले आहे. नदालच्या कारकीर्दीतले हे अखेरचे वर्ष मानले जात असून, आता यापुढे तो विम्बल्डनमध्ये कधीच दिसणार नाही हे स्पष्ट झाले. नदालने २००८ आणि २०१० मध्ये येथे विजेतेपद मिळविले आहे. समाजमाध्यमावरून नदालने आपण या स्पर्धेत खेळणार नसल्याचे जाहीर केले.गेल्याच महिन्यात नदालला फ्रेंच टेनिस स्पर्धेत पहिल्या फेरीत पराभवाचा सामना करावा लागला होता.

# इंग्लंडचा ओमानवर ऐतिहासिक विजय



**। नवी दिल्ली। वृत्तसंस्था ।**

इंग्लंडच्या संघाने शानदार कमबॅक करत सुपर ८ फेरीतील शर्यतीत कायम आहेत. अँटिगा येथील सर व्हिव्हियन रिचर्ड्स स्टेडियम वर इंग्लंड आणि ओमान यांच्यातील सामन्यात इंग्लंडने आश्चर्यकारक कामगिरी केली. या सामन्यात त्यांनी ओमानविरुद्ध मोठा विजय नोंदवला, ज्यामुळे ते अजूनही सुपर८ च्या शर्यतीत आहेत. इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करताना ओमानला अवघ्या ४७ धावांत सर्वबाद केले. त्यानंतर ३.१ षटकात ८ गडी राखून लक्ष्याचा पाठलाग केला.

इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने नाणेफेक जिंकून ओमानविरुद्ध प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अशा स्थितीत इंग्लंडच्या भेदक गोलंदाजीसमोर ओमानचे फलंदाज चांगलेच फसले. तो १३.२ षटकांत अवघ्या ४७ धावांवर सर्वबाद झाला. ओमानकडून शोएब खानने सर्वाधिक ११ धावा केल्या होत्या. इंग्लंडकडून आदिल रशीदने सर्वाधिक ४ बळी घेतले. याशिवाय मार्क वूड आणि जोफ्रा आर्चरनेही ३-३ बळी घेतले.

ओमानचे फलंदाज ज्या खेळपट्टीवर सतत संघर्ष करताना दिसत होते. त्या खेळपट्टीवर इंग्लंडच्या आघाडीच्या फलंदाजांनी कहर केला. ४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंड संघाला फारसा वेळ लागला नाही. इंग्लंडने अवघ्या ३.१ षटकांत लक्ष्याचा पाठलाग केला, ज्यामुळे त्यांच्या नेट रन रेटमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे.

कर्णधार जोस बटलरने ३००च्या स्ट्राईक रेटने ८ चेंडूत नाबाद २४ धावा केल्या, त्याने या खेळीत ४ चौकार आणि १ षटकार लगावला. फिल सॉल्टने ३ चेंडूत १२ तर जॉनी बेअरस्टोने २ चेंडूत ८ धावा केल्या. ओमानकडून बिलाल खान आणि कलीमुल्ला यांनी प्रत्येकी १ बळी मिळवला.

ब गटातून ३ पैकी ३ सामने जिंकून ऑस्ट्रेलिया आधीच सुपर ८ साठी पात्र ठरला आहे. ३ पैकी २ सामने जिंकल्यानंतर आणि एक सामना पावसामुळे रद्द झाल्यानंतर स्कॉटलंड ५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. मात्र, इंग्लंडचा ओमानच्या सामन्यापूर्वी स्कॉटलंडपेक्षा चांगला नव्हता. पण आता ओमानवर मोठा विजय नोंदवल्यानंतर, इंग्लंडचा नेट रन रेट (+३.०८१) स्कॉटलंड (+२.१६४) पेक्षा चांगला झाला आहे. मात्र, इंग्लंडचे सध्या ३ सामन्यांतून ३ गुण आहेत. जर त्यांनी त्यांचा पुढील सामना नामिबियाविरुद्ध जिंकला आणि स्कॉटलंडने त्यांचा शेवटचा गट स्टेज सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध गमावला तर इंग्लंड सुपर ८ साठी पात्र ठरेल.

**इंग्लंडने ३.१ षटकांत ओमानवर मिळवला विजय**

इंग्लंडने ओमानवर अवघ्या ३.१ षटकांत विजय मिळवून मोठा इतिहास रचला. यासह पुरुषांच्या टी-२० विश्वचषक २०२४ त्या इतिहासात ही कामगिरी करणारा पहिला संघ ठरला आहे. टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात इंग्लंडने ओमानवर सर्वाधिक चेंडू शिल्लक ठेवत सर्वात मोठा विजय नोंदवला आहे. त्यांनी १०१ चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला. याआधी टी-२० विश्वचषकात एवढा मोठा विजय कोणत्याही संघाला नोंदवता आलेला नाही. हा विक्रम यापूर्वी श्रीलंकेच्या नावावर होता. २०१४ मध्ये त्याने नेदरलँडविरुद्ध टी-२० विश्वचषक सामना ९० चेंडू शिल्लक असताना जिंकला होता.

# अफगाणिस्तानचा विजयरथ कायम!

## सुपर-८ मध्ये धडक; पापुआ न्यू गिनी पराभूत




**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ट्वेंटी-२० विश्वचषक २०२४ मधील २९ व्या सामन्यात अफगाणिस्तान आणि पापुआ न्यू गिनी हे संघ भिडले. नवख्या संघाचा दारूण पराभव करून अफगाणिस्तानने विजयाची हॅटट्रिक लगावली. यासह अफगाणिस्तानने सुपर-८ मध्ये प्रवेश केला. राशिद खानच्या संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रतिस्पर्धी पापुआ न्यू गिनी संघाला अवघ्या ९५ धावांत गुंडाळून अफगाणिस्तानने सुपर-८ च्या दिशेने कूच केली. त्यांना सुपर-८ मध्ये प्रवेश करण्यासाठी अवघ्या ९६ धावांची आवश्यकता होती, या आव्हानाचा सहज पाठलाग करताना अफगाणिस्तानने मोठा विजय साकारला.

ब्रायन लारा क्रिकेट अकादमी येथे हा सामना पार पडला. पापुआ न्यू गिनीने दिलेल्या ९६ धावांच्या सोप्या आव्हानाचा पाठलाग करताना अफगाणिस्तानने १५.१ षटकांत ३ बाद १०१ धावा केल्या. यासह राशिदच्या संघाने ७ गडी आणि २९ चेंडू राखून सामना आपल्या नावावर केला. अफगाणिस्तानकडून गुलाबदीन नायबने सर्वाधिक नाबाद धावा केल्या. तत्पुर्वी, अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि प्रतिस्पर्धी पापुआ न्यू गिनी संघाला अवघ्या ९५ धावांत गुंडाळले. पापुआ न्यू गिनी संघाकडून यष्टीरक्षक फलंदाज किप्लिन डोरिगा वगळता एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही.

फिरकीपटूंनी प्रतिस्पर्धी संघाच्या फलंदाजांना घाम फोडला. अफगाणिस्तानकडून फजलहक फारूकीने सर्वाधिक (३) बळी घेतले, तर नवीन-उल-हक (२) आणि नूर अहमदने (१) बळी घेतला. पापुआ न्यू गिनीचे तब्बल चार फलंदाज धावबाद झाले. अखेर पापुआ न्यू गिनीचा संघ १९.५ षटकांत केवळ ९५ धावांत गारद झाला. ९६ धावांच्या सोप्या आव्हानाचा पाठलाग करताना अफगाणिस्तानने सहज विजय मिळवला. अफगाणिस्तानने तीनपैकी सर्व तीन सामने जिंकून सहा गुणांसह सुपर-८ मध्ये प्रवेश केला. त्आता न्यूझीलंडने उर्वरीत दोन सामने जिंकले तरी त्यांना सुपर-८ ची फेरी गाठता येणार नाही.



# न्यूझीलंडच्या संघ विश्वचषकातून बाहेर

**। अमेरिका । वृत्तसंस्था।**

न्यूझीलंडच्या संघासाठी ट्वेंटी-२० विश्वचषक २०२४ म्हणजे एक वाईट स्वप्नच. केन विल्यमसनच्या नेतृत्वातील संघाला पहिल्या दोन सामन्यांमध्ये पराभव पत्करावा लागला. गुरुवारी वेस्ट इंडिजने न्यूझीलंडचा पराभव करून सुपर-८ मध्ये प्रवेश केला.

अशातच एका पाकिस्तानी पत्रकाराने न्यूझीलंड संघाची खिल्ली उडवली आणि त्यांच्या देशाप्रती असलेल्या खेळाडूंच्या निष्ठेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मात्र न्यूझीलंडचा माजी क्रिकेटपटू मिचेल मॅकक्लेनघनने या पत्रकाराला फटकारले आहे.पाकिस्तानच्या पत्रकाराने केन विल्यमसन बाद झाल्याचा एक फोटो शेअर केला. यामध्ये त्याने लिहिले की, जेव्हा आपण राष्ट्रीय कर्तव्यापेक्षा पैशाला अधिक महत्त्व देऊ लागतो तेव्हा हे घडते. (विल्यमसन १ धाव करून बाद) पाकिस्तानविरुद्धच्या मालिकेतून न्यूझीलंडला ट्वेंटी-२० विश्वचषकाची तयारी करण्याची सुवर्णसंधी होती, मात्र अनेक बडे खेळाडू आयपीएलमध्ये खेळत राहिले. आता बघा ते वर्ल्ड कपमधून बाहेर होत आहेत.मिचेल मॅकक्लेनघनचा संतापपाकिस्तानी पत्रकाराने भलतीच बाब मांडल्यानंतर न्यूझीलंडचा माजी खेळाडू संतापला. त्याने पाकिस्तानची लायकी काढली. न्यूझीलंडचा माजी क्रिकेटपटू मिचेल मॅकक्लेनघनने पाकिस्तानी पत्रकाराच्या पोस्टवर व्यक्त होताना म्हटले की, हा तोच पाकिस्तान संघ आहे जो न्यूझीलंडच्या 'सी' संघाकडून पराभूत झाला होता. याशिवाय आयर्लंड आणि अमेरिकेकडूनही त्यांना पराभव पत्करावा लागला आहे. दरम्यान, वेस्ट इंडिज आणि न्यूझीलंड हे संघ क गटात आहेत. या गटातून सुपर-८ साठी पात्र ठरणारा वेस्ट इंडिज पहिला संघ ठरला. त्यांनी तीनपैकी ३ सामन्यांमध्ये विजय मिळवला. दुसरीकडे न्यूझीलंडने दोनपैकी दोन्ही सामने गमावले आहेत. अफगाणिस्तानने दोनपैकी दोन्ही सामने जिंकून चार गुणांसह सुपर-८ साठी दावा ठोकला आहे. खरे तर न्यूझीलंडने उर्वरीत दोन सामने जिंकल्यास आणि अफगाणिस्तानने उरलेले दोन्ही सामने गमावल्यास दोन्ही संघांचे ४-४ गुण राहतील. पण, नेटरनरेटच्या बाबतीत राशिद खानचा संघ वरचढ असल्याने ते सुपर-८ साठी पात्र ठरण्याची शक्यता अधिक आहे. सध्या अफगाणिस्तानचा सामना सुरू असून, ते सहज विजय मिळवून सुपर-८ चे तिकीट कन्फर्म करतील असे अपेक्षित आहे.

# मेस्सीची ऑलिम्पिकमधून माघार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



फुटबॉल सुपरस्टार असला तरी आता लागोपाठ स्पर्धा खेळण्याचे वय राहिले नाही, त्यामुळे लिओनेल मेस्सीने पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेतून माघार घेतली आहे. परिणामी, विश्वविजेत्या अर्जेंटिना संघाला मेस्सीशिवाय खेळावे लागणार आहे.३६ वर्षे वय असलेला मेस्सी कोपा अमेरिका फुटबॉल स्पर्धेत विजेतेपद राखण्यासाठी लढणार आहे. त्यानंतर लगेचच २६ जुलैपासून पॅरिस ऑलिंपिक सुरू होत आहे.

मेस्सीच्या नेतृत्वाखाली अर्जेंटिना संघाने बीजिंग ऑलिंपिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. ऑलिंपिकमध्ये फुटबॉलसाठी २३ वर्षांखालील खेळाडू खेळवण्याचा नियम आहे, मात्र तीन व्यावसायिक दर्जाचे खेळाडू खेळवू शकतात. पॅरिसमध्ये संघासोबत राहण्यास आम्ही मेस्सीला आग्रह केला आहे, असे अर्जेंटिनाच्या संघाचे प्रशिक्षक झेव्हियर मस्कारेन्हो यांनी सांगितले. मी मस्कारेन्हो यांच्याशी चर्चा केली आहे आणि दोघांनाही सत्य परिस्थिती माहिती आहे, असे मेस्सीने स्पष्ट केले.

क्लब फुटबॉल त्यानंतर आता कोपा अमेरिका आणि ऑलिंपिक सलग तीन महिने स्पर्धा आहेत, त्यामळे ऑलिंपिकचा मी सध्या विचारही केलेला नाही. तसेच प्रत्येक स्पर्धेत खेळावे, असे आता वय नाही. कोणत्या स्पर्धांत खेळायचे याची निवड मला सर्व परिस्थितीचा विचार करून करावा लागणार आहे. ऑलिंपिकमध्ये मस्कारेन्हो यांच्यासोबत खेळून सुवर्णपदक मिळवता आले हे माझे भाग्य आहे, त्या सुवर्ण आठवणी मी विसरू शकत नाही, असे मेस्सीने सांगितले.

# ...अन् दुर्घटना टळली

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये बांगलादेश विरुद्ध नेदरलँड्स सामन्यात एक विचित्र घटना घडली. नाणेफेक जिंकल्यानंतर नेदरलँड्सने बांगलादेशला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. दरम्यान, डच संघाचा व्हिव्हियन किंग्मा गोलंदाजी करत असताना त्याचा एक चेंडू बांगलादेशचा सलामीवीर तनजीद हसनच्या हेल्मेटच्या ग्रिलमध्ये जाऊन अडकला. या बाऊन्सर चेंडूवर फलंदाजाला दुखापत होऊ शकली असती, मात्र हेल्मेटच्या ग्रीलमुळे मोठी दुर्घटना टळली.

बांगलादेशच्या डावाच्या तिसऱ्या षटकात ही घटना घडली, जेव्हा विवियन किंग्मा डच संघासाठी गोलंदाजी करण्यासाठी आला होता. किंग्माने षटकातील पहिल्या ४ चेंडूत १४ धावा दिल्या होत्या, परंतु त्याच दरम्यान त्याने पाचव्या चेंडूवर बाउन्सर टाकला. ताशी १३४ किमी वेगाने येणाऱ्या बाउन्सर चेंडूवर पुल शॉटसाठी तनजीदने बॅट फिरवली, पण चेंडू त्याच्या हेल्मेटच्या ग्रिलमध्ये जाऊन अडकला.



## विश्व ज्युनिअर बुद्धिबळ स्पर्धा

# दिव्या देशमुख चॅम्पियन

**। गांधीनगर । वृत्तसंस्था ।**

बुद्धिबळपटू दिव्या देशमुख हिने येथे गुरुवारी संपलेल्या मुलींच्या विश्व ज्युनिअर बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. अखेरच्या फेरीत दिव्याने बल्गेरियाची बेलोस्लावा क्रस्टेवाचा पराभव केला.

२७ देशांतील १०१ खेळाडू स्पर्धेत सहभागी झाले होते. दिव्याने ११ फेऱ्यांमधून सर्वाधिक दहा गुणांची कमाई केली. फिडे रेटिंगनुसार दिव्या आणि क्रस्टेवा यांचा २० वर्षांखालील ज्युनिअर क्रमवारीत अव्वल तीन खेळाडूंमध्ये समावेश आहे. तिसऱ्या स्थानावर असलेल्या दिव्याला आता अव्वल स्थानावर झेप घेण्याची संधी असेल. १८ वर्षांच्या दिव्याने आपली सहकारी साची जैन हिच्यावर मात करत गुणसंख्या नऊ केली. त्यानंतर अर्मेनियाची मरियम मकर्चयन हिच्याविरुद्ध अर्ध्या गुणाची आघाडी घेतली. त्याआधी खुल्या तसेच मुलींच्या गटात साडेपाच गुणांसह प्रबळ दावेदार म्हणून वाटचाल करणाऱ्या नागपूरच्या या खेळाडूने अखेरच्या पाच फेऱ्यांमध्ये एकमेव आघाडी कायम राखली होती. या यशासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिव्याचे कौतुक केले आहे. ९ डिसेंबर २००५ ला नागपुरात जन्मलेली दिव्या आंतरराष्ट्रीय मास्टर असून २०२२ ला महिला बुद्धिबळ चॅम्पियन, २०२३ ला आशियाई महिला चॅम्पियन बनली होती.

> अपेक्षांचे ओझे असल्याने दबावाचा सामना कसा करायचा, याचे कसब मी आत्मसात केले होते. मला माझ्या स्वत:कडूनदेखील खूप अपेक्षा होत्या; पण मी चित्त विचलित होऊ दिले नाही. एकावेळी एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित करायचे, हे मी ठरवले होते.
>
> – दिव्या देशमुख

# पाकचे भवितव्य आज

**। अमेरिका । वृत्तसंस्था ।**

अमेरिका आणि भारत यांच्याकडून पराभव स्वीकारल्यानंतर पाकिस्तानने कॅनडाविरूद्ध विजय मिळवला. त्यामुळे ट्वेंटी-२० विश्वचषक २०२४ मधील त्यांचे आव्हान कायम आहे. आज शुक्रवारी यजमान अमेरिका आणि आयर्लंड यांच्यात सामना होत आहे. या सामन्यातून पाकिस्तानी संघाचे भवितव्य ठरणार आहे. आजचा सामना अमेरिकेने जिंकल्यास किंवा पावसामुळे रद्द झाल्यास पाकिस्तान विश्वचषकातून बाहेर होईल. आयर्लंडचा विजय पाकिस्तानला स्पर्धेत जिवंत ठेवू शकतो.

खरे तर पाकिस्तानचा साखळी फेरीतील अखेरचा सामना देखील आयर्लंडविरूद्ध होणार आहे. पण, त्यासाठी आज आयर्लंडचा विजय पाकिस्तानसाठी गरजेचा आहे. अन्यथा रविवारी होणारा पाकिस्तान आणि आयर्लंड यांच्यातील सामना म्हणजे केवळ औपचारिकता असेल. फ्लोरिडा येथे आयर्लंड आणि अमेरिका यांच्यात लढत होत आहे. स्थानिक वेळेनुसार सकाळी १० वाजल्यापासून सामन्याला सुरुवात होईल. हवामान विभागाने पावसाची शक्यता वर्तवल्याने शेजाऱ्यांची डोकेदुखी वाढली आहे. आज अमेरिकेने विजय मिळवल्यास ते सहा गुणांसह सुपर-८ साठी पात्र ठरतील. जर आयर्लंडने अमेरिकेला पराभूत केल्यास पाकिस्तानचे स्पर्धेतील आव्हान कायम राहील. त्यामुळे आजचा सामना पाकिस्तानसाठी अत्यंत महत्त्वाचा असणार आहे.

पाकिस्तानचा शेवटचासामना आयर्लंडविरूद्ध होणार आहे. हा सामना पावसामुळे रद्द झाल्यास दोन्हीही संघांना प्रत्येकी १-१ गुण मिळेल. असे झाल्यास पाकिस्तान स्पर्धेबाहेर होईल आणि अमेरिका अ गटातून सुपर-८ मध्ये प्रवेश करणारा दुसरा संघ ठरेल. लक्षणीय बाब म्हणजे फ्लोरिडा येथे या आठवड्यात मुसळधार पाऊस होईल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. खासकरून अमेरिका विरूद्ध आयर्लंड आणि आयर्लंड विरूद्ध पाकिस्तान यांच्या सामन्यात पाऊस होण्याची शक्यता आहे. पाकिस्तान आणि आयर्लंड यांच्यातील सामना स्थानिक वेळेनुसार सकाळी १० वाजता सुरू होणार आहे.

## पहिल्या सामन्यात यजमान जर्मनीची गाठ स्कॉटलंडशी

# युरो फुटबॉल स्पर्धेचा थरार आजपासून

**। म्युनिक (जर्मनी) । वृत्तसंस्था ।**

फुटबॉल विश्वातील दुसरी लोकप्रिय युरो चषक स्पर्धा जर्मनीत सुरू होणार आहे. जर्मनी प्रथमच या स्पर्धेचे यजमानपद भूषवत आहे. यापूर्वी पश्चिम जर्मनीने १९८८ मध्ये स्पर्धेचे आयोजन केले होते. स्वतंत्रपणे स्पर्धेचे आयोजन करताना जर्मनीसमोर पहिल्या सामन्यात स्कॉटलंडचे आव्हान राहणर आहे.

स्पर्धेच्या स्वरूपात अनेक बदल झाल्यापासून केवळ तिसऱ्यांदा या स्पर्धेत २४ संघ सहभागी होणार आहेत. क्लब फुटबॉल स्पर्धेचा हंगाम संपला असून, आता फुटबॉल प्रेमींचे लक्ष १७व्या युरो स्पर्धेकडे राहणार आहे. यजमान जर्मनी आणि स्पेनने तीन वेळा या स्पर्धेचे विजेतेपद मिळवले आहे. गतविजेते इटली आणि २०१८ मधील विश्वचषक विजेते फ्रान्स यांनी दोन वेळा या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले असून, या स्पर्धेतून जॉर्जिया पदार्पण करणार आहे. १५ जूनपासून एक महिनाभर फुटबॉलपटूंचा ९० मिनिटांचा पदन्यास जगभरातील फुटबॉल चाहत्यांना खिळवून ठेवणार आहे.



जर्मनी विजयी सुरुवातीसाठी उत्सुक यापूर्वी काय घडले हे विसरून जर्मनी घरच्या मैदानावर विजयी सुरुवात करण्यासाठी उत्सुक आहे. जर्मनी आणि स्कॉटलंड यांच्यात आतापर्यंत १३ सामने झाले असून, स्कॉटलंडने केवळ एकच जिंकला आहे. आम्ही केवळ चर्चा करायला आलेलो नाही. पूर्वी काय घडले यापेक्षा या वेळी काय घडणार आहे हे महत्त्वाचे. आम्ही अनेक चढ-उतार बघितले आहेत. पण, मोठ्या स्पर्धेत उतरल्यावर सुरुवात यशस्वी होणे केव्हाही चांगले. आमच्यासाठी हा सामना खूप महत्त्वाचा आहे, असे जर्मनीचा बचावपटू अँटोनियो रुडिगरने सांगितले.

या स्पर्धेला विशेष महत्त्व असते. अपेक्षा खूप असतात. संपूर्ण जगाचे युरोपियन देशांच्या कामगिरीकडे लक्ष असते. आमची गेल्या काही स्पर्धेतील कामगिरी चांगली नाही, पण या वेळी आम्ही विजयी सुरुवात करण्यास उत्सुक आहोत, असे जर्मनीचे प्रशिक्षक ज्युलियन नागेल्सन म्हणाले.जर्मनी एक सर्वोत्तम संघ आहे. अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धा आणि सामन्यांच्या त्यांना अनुभव आहे. अशा मोठ्या स्पर्धात जर्मनीसारखे तगडे संघ आपला सर्वोत्तम खेळ दाखवत असतात, असे स्कॉटलंडचा आक्रमक खेळाडू रायन क्रिस्टी म्हणाला.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय २५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- अलिबाग येथे हॉस्पिटलमध्ये कामासाठी पुरूष कर्मचारी पाहिजेत. योग्य पगार दिला जाईल. डॉ.सरोज तांबोळी मेमोरिअल हॉस्पिटल-रामनाथ. डॉ.अतुल कोतेकर- ७७९८८८०७०४, प्रिया कर्णिक-९३७२२०४९७०

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

www.krushival.in | कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)





# आकर्षक श्रीलंका

सफर देशांची

पर्यटनाच्या दृष्टीने श्रीलंका या देशाला एक विशेष महत्त्व आहे. तो भारताचा शेजारी देश आहे. तसेच हिंदी महासागरातले छोटे बेट अशीही त्याची ओळख आहे. भारताच्या दक्षिणेकडे असलेला हा देश सिलोन या नावाने ओळखला जात असे. १६ व्या शतकात पोर्तुगिज या बेटावर आले. त्यानंतर साधारण १०० वर्षांनी डचांनी श्रीलंकेवर आक्रमण केलं. १७९६ मध्ये ब्रिटिशांचं आगमन झालं. १९४८ मध्ये श्रीलंकेला स्वातंत्र्य मिळालं. सुरुवातीच्या काळात श्रीलंकेत साम्यवाद होता. पण १९७२ नंतर हा देश लोकशाहीकडे वळला आणि मग सिलोन अधिकृतपणे 'श्रीलंका' म्हणून ओळखला जाऊ लागला. सिंहली ही इथली अधिकृत भाषा आहे. या देशातल्या लोकांवर बौद्ध धर्माचा पगडा आहे. तामिळ वंशाच्या लोकांची संख्याही इथे बरीच जास्त आहे. ४ फेब्रुवारीला श्रीलंकेचा स्वातंत्र्यदिन असतो.

रबर, चहा, नारळ, तंबाखू तसंच इतर शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग या देशात आहेत. या देशात भात, ऊस, विविध प्रकारची धान्यं, डाळी, तेलबिया, मसाले, चहा, रबर, नारळ, दूध, अंडी, मासे यांचे उत्पादन होते. श्रीलंकेतून कपड्यांची मोठ्या प्रमाणावर निर्यात होते. चहा आणि मसाले, हिरे, माणिक, नारळाशी संबंधित उत्पादनं, मासे यांचीही निर्यात मोठ्या प्रमाणावर केली जाते. श्रीलंकन रूपया हे इथले चलन आहे. सुंदर समुद्रकिनारे हे इथले प्रमुख आकर्षण. कोलंबो ही श्रीलंकेची राजधानी. महावेली ही इथली सर्वात मोठी नदी आहे. श्रीलंकेच्या दक्षिण-मध्य भागात उंच डोंगर आणि खोल दऱ्या आहेत. श्रीलंकेतलं वातावरण वर्षभर उष्ण आणि दमट असतं. देशाच्या दक्षिण-पश्चिम भागात भरपूर पाऊस पडतो. श्रीलंकेत जंगलाचे प्रमाणही बरेच आहे. बिबट्या, अस्वल, रानडुक्कर, हत्ती, मोर, माकडं असे प्राणी इथे आढळतात. या देशात बरीच राष्ट्रीय उद्यानंही आहेत.





# बोस्साबॉल आणि बलुनिस्ट

फन टाईम

बोस्साबॉल हा अनोखा खेळ आहे. स्पेनच्या फिलिप इकमान्स यांनी २००४ मध्ये या खेळाचा शोध लावला. बोस्साबॉल हा व्हॉलीबॉलसारखा खेळ आहे. पण फुटबॉल, जिम्नॅस्टिक्स आणि कॅपोइरा या खेळांची झलकही यात पहायला मिळते. हा खेळ खेळण्यासाठी खास कोर्ट तयार केलं जातं. मधोमध जाळी असते. या खेळात दोन संघ सहभागी होतात. प्रत्येक संघात तीन किंवा पाच खेळाडू असतात.

बलुनिस्ट नावाचा एक खेळ आहे. हा खेळ खेळण्यासाठी एक फुगा लागतो. हा फुगा जमिनीवर पडणार नाही यासाठी खेळाडूंनी प्रयत्न करायचा असतो. या खेळात सहभागी खेळाडूंना एकमेकांना लागणार नाही याचीही काळजी घ्यायची असते. यात एखाद्या खेळाडूला प्रतिस्पर्धी संघाच्या खेळाडूच्या चुकीमुळे लागलं तर दोन गुण मिळतात.

# कलेच्या प्रांगणात...

धम्माल

सध्याचे विद्यार्थी ऑलराऊंडर आहेत असे समजले जाते. ते फक्त अभ्यासाचेच नाही तर इतरही क्षेत्रांचे ज्ञान त्यांना अवगत आहे. त्यासाठी मुलं वेगवेगळ्या क्लासना जातात. कोणी गाणं शिकतं तर कोणी डान्स. कोणाला एखादा खेळ खेळायला आवडतं. तर कोणी छान चित्र काढतं. काही जण तर ऑलराउंडर असतात. दोन ते तीन कला एकाच वेळी शिकत असतात. अशा कला जोपासण्याचे, शिकण्याचे अनेक फायदे असतात. याद्वारे तुम्हाला नवे मित्र जोडता येतात. शिक्षणासाठीही याचा फायदा होतो. तुम्हाला एखादी कला अवगत असेल तर त्याचा फायदा कॉलेजमध्ये प्रवेश घेताना होऊ शकतो. नोकरीत चांगल्या संधी मिळू शकतात. तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा खूप छान विकास होतो.



कोणती कला शिकायची हे कसं ठरवायचं तर सर्वात आधी आपल्याला काय आवडतं हे जाणून घ्या. गायन, नृत्य, वादन, खेळ यापैकी कशात जास्त रस आहे हे जाणून घेतल्यानंतरच पुढे जा. एखादी कला शिकण्यामागचा उद्देश जाणून घ्या. या कलेतच पुढे करीअर करायचं असेल तर त्यादृष्टीने प्रयत्न करा. खेळामुळे तुमच्यात नेतृत्त्वगुण विकसित होतात. तुमचा आत्मविश्वास वाढतो. नवी भाषा शिकली तर जगात तुम्ही अगदी सहजपणे वावरू शकता. एकाच वेळी एकापेक्षा जास्त कला शिकायच्या असतील तर वेळेचं नीट नियोजन करणं गरजेचं आहे. अभ्यास सांभाळून आपल्याला या कला शिकायच्या आहेत हे लक्षात ठेवा. त्यामुळे शाळा आणि क्लासच्या वेळांशिवाय इतर वेळा ठरवा. तसंच तुमच्या अभ्यासाचा वेळही ठरवून घ्या. एकाच वेळी अनेक आघाड्यांवर लढताना काळजी घ्या. तुम्हाला तब्येतीची काळजीही घ्यायला हवी.

# मारुती सुझुकीची 'फ्लाईंग कार'

व्हॉट्स न्यू?




बालमित्रांनो, आपल्याला उडणाऱ्या गाड्यांमध्ये बसून आपण प्रवास करत आहोत, अशी स्वप्न कधी कधी पडतात ना! पण आता हे स्वप्न प्रत्यक्षात येणार आहे. मारुती सुझुकी आपली मूळ कंपनी सुझुकी सोबत मिळून इलेक्ट्रिक एअर कॉप्टर्स बनवण्याच्या तयारीत आहे. सुरुवातीला कंपनी हे उत्पादन जपान आणि अमेरिकेसारख्या बाजारात उतरवणार आहे. नंतर भारतीय बाजारात देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. हे एअर कॉप्टर्स ड्रोनपेक्षा मोठे आणि सामान्य हेलिकॉप्टर्सच्या तुलनेत छोटे असतील. यामध्ये पायलटसह कमीत कमी तीन लोकांची बैठक व्यवस्था असेल. भारतीय बाजारात सादर करण्यासाठी या कॉप्टर्सची किंमत कमीत कमी ठेवण्यात येणार आहे. यासाठी उत्पादनाची निर्मिती स्थानिक स्तरावर उपलब्ध करून देण्याचा विचारदेखील कंपनी करत आहे. या एअर कॉप्टरचे वजन पारंपरिक हेलिकॉप्टरच्या वजनाच्या जवळपास निम्मे असेल. कमी वजनामुळे इमारतीच्या छताचा वापर टेक ऑफ आणि लँडिंगसाठी करता येईल. विद्युतीकरणामुळे एअर कॉप्टरच्या घटकांमध्ये लक्षणीय घट झाली आहे. यामुळे त्याचे उत्पादन आणि देखभाल खर्च दोन्ही कमी होतील. 'स्कायड्राईव्ह' नावाच्या इलेक्ट्रिक एअर कॉप्टर्सला २०२५ पर्यंत ओसाका एक्स्पोमध्ये सादर करण्यात येणार आहे.

# या सवयी महत्त्वाच्या!

लक्षात ठेवा

आपण शाळेत आणि समाजात वावरताना काही गोष्टी काळजीपूर्वक ध्यानात ठेवल्या पाहिजेत. आपल्या आजूबाजूच्या लोकांना शक्य असेल तेवढी मदत आपण केली पाहिजे. त्यातून आपल्याला मिळून मिसळून वागायची सवय लागते. आपल्या वस्तू एकमेकांसोबत शेअर करण्याची आणि एकत्र राहण्याची सवय ठेवा. असे केल्याने आपण इतरांबरोबर आनंदी राहायला शिकतो. लोकांना भेटणे आणि त्यांना अभिवादन करणे ही चांगली वर्तणूक मानली जाते. फक्त बाहेरच्याच नव्हे तर घरातही मोठ्यांचा आदर करायला शिका. मोठ्या माणसांना भेटाल तेव्हा त्यांच्यासमोर शिस्तीने वागा आणि त्यांचे ऐका. लहान वयापासूनच स्वावलंबी असणे देखील खूप महत्वाचे आहे. स्वत:ची कामे स्वत: करायला शिका. कामांची सवय असेल तर तुम्हाला कुठेही अडणार नाही, हे लक्षात घ्या. वेळेचे महत्त्व जाणून घ्यायला शिका. वेळेच गणित जमले तर आयुष्यात नक्की यशस्वी व्हाल.






## ओळखा पाहू...

जिज्ञासा

१) आशियाई क्रीडा स्पर्धेत कुस्तीमध्ये सुवर्णपदक जिंकणारी पहिली महिला कोण?
२) २०१८ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेचं आयोजन कोणत्या देशात करण्यात आलं आहे.?
३) पिसाचा कलता मनोरा कोणत्या देशात आहे?
४) सूर्यमालेतल्या कोणत्या ग्रहाला उपग्रह नाही?
५) बाकू ही कोणत्या देशाची राजधानी आहे?
६) म्यानमार या देशाचं चलन कोणतं?
७) भारताच्या कसोटी क्रिकेट संघाचे पहिले कर्णधार कोण?
८) मानाचा ऑस्कर पुरस्कार जिंकणारे पहिले भारतीय कोण?
९) देशातल्या कोणत्या राज्यात अंड्यांचं सर्वात जास्त उत्पादन होतं?
१०) पहिली दुरंतो एक्सप्रेस कोणत्या दोन शहरांदरम्यान धावली?

उत्तर : १) विनेश फोगट २) इंडोनेशिया ३) इटली ४) शुक्र ५) अझेरबैजान ६) क्यात ७) सी.के. नायडू ८) भानू अथैय्या ९) आंध्र प्रदेश १०) सिलदाह-नवी दिल्ली

# ब्लू झोनची किमया

वेगळे काही

मित्रांनो, तुम्हाला माहीत आहे का, जगामध्ये अशी काही ठिकाणं आहेत. जिथे लोक १०० वर्षांपेक्षा जास्त जगतात. विशेष म्हणजे त्या ठिकाणचे लोक केवळ दीर्घकाळ जगत नाहीत तर ते निरोगी आणि रोगमुक्त जीवन जगतात. या भागांना 'ब्लू झोन' म्हणतात. या भागातील लोकांचे जीवन निसर्गाच्या अगदी जवळ आहे. प्रक्रिया केलेल्या आणि औद्योगिकरित्या उत्पादित वस्तू खाण्याऐवजी ते केवळ निसर्गात वाढणाऱ्या गोष्टी खातात. अमेरिकन लेखक आणि एक्स्प्लोरर डॅन बुएटनर संशोधन करत असताना १०० वर्षांपेक्षा जास्त वय असणारे क्षेत्र नकाशावर शोधत होते. त्या भागाची ओळख पटवण्यासाठी नकाशावर खुणा करत असताना त्यांच्या हातात निळा पेन होता. नकाशावर त्या भागांना निळ्या शाईने अधोरेखित केल्यामुळे ती ठिकाणे 'ब्लू झोन' म्हणून ओळखली जाऊ लागली. या पाच ठिकाणांपैकी दोन उत्तर अमेरिकेमध्ये आणि दोन युरोपमध्ये आहेत, तर एक जागा आशियामध्ये आहे. साधारणपणे हे लोक कोणत्याही गोष्टीचा जास्त ताण घेत नाहीत. घडल्यावर ते एकटे नसतात. प्रत्येकजण एकमेकांसाठी असतो. हे लोक जेवण्यापूर्वी 'हारा हाची बु' मंत्र म्हणतात. म्हणजे तुमचे पोट ८०% भरले की, खाणे थांबवा. यामुळे त्यांची पचनक्रिया चांगली राहते आणि आळसही वाटत नाही. संपूर्ण जग न्यूक्लियर फॅमिलीकडे वाटचाल करत आहे. पण ब्लू झोनचे लोक संयुक्त कुटुंबावर विश्वास ठेवतात. लहान मुले, म्हातारे, तरुण सगळेच इथे एकत्र राहतात. हे लोक गरजेच्या वेळी एकमेकांसाठी शारीरिक, मानसिक आणि भावनिक आधार बनतात. ठरवले तर आपणही आपले आयुष्य वाढवू शकतो. रोगांपासून मुक्त राहू शकतो. यासाठी ब्लू झोनमधील लोकांच्या जीवनाचा आदर्श घेतला पाहिजे.





# मानव संसाधन विश्वात...

कोण होणार?

कोणत्याही कंपनीचा दर्जा वाढवण्यात एचआर मॅनेजरची महत्त्वाची भूमिका असते. एमबीए इन ह्युमन रिसॉर्स ही पदवी मिळवल्यानंतर तुम्ही कोणत्याही कंपनीमध्ये एचआर मॅनेजर पदासाठी अर्ज करू शकता. एचआर मॅनेजरला कर्मचाऱ्यांशी संबंधित विविध बाबींकडे लक्ष द्यावं लागतं. कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढवण्याचे प्रयत्न करावे लागतात. त्यांचं हित जपावं लागतं. एमबीए इन ह्युमन रिसॉर्स ही पदवी मिळवल्यानंतर इतर काही अभ्यासक्रम तुम्ही करू शकता. ट्रेनिंग ॲण्ड डेव्हलपमेंटमध्ये प्रमाणपत्र अभ्यासक्रम, लेबर लॉ, ऑर्गनायजेशनल सायकोलॉजी, इंडस्ट्रियल रिलेशनसारखे अभ्यासक्रमही तुम्ही पूर्ण करू शकता. यामुळे या क्षेत्रात अधिक संधी मिळू शकतील.

एमबीए इन एचआर केल्यानंतर कंपनीत कॉम्पेनसेशन मॅनेजर, मॅनेजर ऑफ एम्प्लॉई रिलेशन, टेक्निकल रिक्रूटर, डायरेक्टर ऑफ स्टाफ प्लेसमेंट मॅनेजर, ट्रेनिंग ॲण्ड रिलेशन मॅनेजर अशी पदं भूषवू शकता. या क्षेत्रात अनेक कंपन्या तुम्हाला संधी देतात. संवादकौशल्य, निर्णयक्षमता यासारखे गुण या क्षेत्रात गरजेचे असतात.

# अभ्यासादरम्यान झोप येते?

स्टडी टिप्स



आता बऱ्याच जणांच्या शाळा सुरू झाल्या असतील. शाळा सुरू झाल्या की मित्र-मैत्रिणींबरोबर धम्माल मस्तीही चालू होते. शाळेमध्ये विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांचे वातावरण असते. त्याची मजा संपत नाही तोच परीक्षांचे दिवस येतात. त्या काळामध्ये सर्वजण अभ्यासाला कसून सुरू करतात. प्रत्येकाची अभ्यासाची स्वत:ची पद्धत असते. काही दिवसा अभ्यास करतात तर काही रात्री. काही वेळा अभ्यास करताना खूप झोप येते. वाचताना येणारी झोप आपल्या स्मरणशक्तीसाठी खूप हानिकारक आहे. यामागच्या वैज्ञानिक कारणांबद्दल सांगायचे झाले तर वाचताना सर्वात जास्त दबाव आपल्या डोळ्यांवर पडतो. त्याचबरोबर आपला मेंदू संगणकासारखा सर्व डेटा साठवून ठेवतो. एवढ्या दडपणामुळे आपले डोळे आणि मेंदूला विश्रांती हवी असते याच कारणामुळे वाचताना आपल्याला झोप येते. अशावेळी काय करायचे? जाणून घेऊ या. अभ्यास करताना झोप येऊ नये म्हणून नेहमी सरळ बसून अभ्यास करा. त्यामुळे आळस येणार नाही. स्वत:साठी एक स्टडी कॉर्नर ठरवा आणि त्याच ठिकाणी अभ्यास करण्याचा प्रयत्न करा. हवे असल्यास कुठेतरी फेरफटका मारून तुम्ही मूड फ्रेश करू शकता. तसेच तुम्ही चालता चालताही अभ्यास करू शकता. सतत बसून कंटाळा आला असेल किंवा अजिबात अभ्यास करावासा वाटत नसेल तर चालताना उजळणी करा. चालताना इतिहास, भूगोल, इंग्रजी यांसारख्या विषयांचा अभ्यास करता येतो.

ठिपके जुळवा



### दोस्त हे मस्त

## डस्की गॉफर फ्रॉग

डस्की गॉफर फ्रॉगची संख्या ६० ते १०० पर्यंत आहे. मिसिसिपीतल्या दोन डबक्यांमध्ये हे बेडूक आढळतात. या बेडकांची संख्या झपाट्याने कमी झाली आहे. यामागे अनेक कारणं आहेत. त्यामुळे या बेडकांना वाचवण्याची गरज निर्माण झाली आहे.



### खादाडी

## मिनिऑन ओरियो



गोड खावसं वाटलं तर तुम्ही साधी सोपी मिनिऑन ओरिओ ही डिश बनवू शकता. यासाठी दोन कप व्हाईट चॉकलेट चिप, एक चमचा खोबरेल तेल, पिवळा खायचा रंग, १२ ओरिओ बिस्किटं आणि काळ्या रंगाचं कुकी आयसिंग असं साहित्य घ्या. एका बाउलमध्ये व्हाईट चॉकलेट चिप्स, खोबरेल तेल आणि ४ ते ४ थेंब पिवळा रंग घाला. साधारण ३० सेकंद मायक्रोवेव्ह करा. व्हाईट चॉकलेट विरघळायला हवं. एक बेकिंग शीट तयार करा. आता ओरिओ बिस्किट या मिश्रणात बुडवा आणि बेकिंग शीटवर ठेवा. आता ब्लॅक आयसिंगनी तोंड आणि मिशी काढा. डोळ्यांच्या जागी कँडी आईज ठेवा.

### लाईफस्टाईल

## डोकं दुखतंय?

डोकेदुखी कोणालाही कधीही होऊ शकते. डोकं दुखू लागलं की अनेक जण औषधं घेतात. पण त्याऐवजी काही घरगुती उपायांनी तुम्ही बरे होऊ शकता. खूप डोकं दुखत असेल तर निलगिरीच्या तेलाने मालिश करता येईल. पाण्यात आलं घालून ते पाणी उकळून घ्या. मग त्याची वाफ घ्या. आलं आणि लिंबाचा रस प्या. पुदिन्याचा रस काढून कपाळावर लावल्यानेही आराम मिळतो. त्यामुळे यापुढे डोकं दुखलं तर असे उपाय करून बघता येतील.



### योगा टाईम

## कोब्रा पोज

रक्ताभिसरण सुधारण्यासाठी मुलं कोब्रा पोज करू शकतात. हे आसन करण्यासाठी पोटावर झोपा. पाय मागच्या बाजूला पसरवा. दोन्ही हात जमिनीला टेकवा.



आता डोकं आणि छाती वर करा. पाठीचा कणा ताठ ठेवा. काही काळ या स्थितीत राहा.

# कलासक्त

> भारतीय चित्रपट विश्वातील नायक नायिका यांच्या वैयक्तिक आयुष्यातील प्रेमकहाण्या देखील तितक्याच रंजक आहेत. यात आजही जाची चर्चा होते त्या राज कपूर आणि नर्गिस यांची प्रेमकहाणी एखाद्या चित्रपटापेक्षाही रोमहर्षक आहे.

## राज कपूर-नर्गिस प्रेमकहाणी



**श्रीराम शेटये**

सन १९४६ सालातली गोष्ट आहे. राज कपूर आपला पहिला वहिला चित्रपट 'आग' बनवत होता. तो मुंबईत शुटींगसाठी स्टुडिओ शोधत होता. त्याला कोणीतरी सांगितले की, मुंबईत फेमस स्टुडिओत जद्दनबाई आपला 'रोमीओ और जुलीएट' हा सिनेमा बनवित आहे. जद्दनबाई ही भारतीय चित्रपट अभिनेत्री निर्माती, संगीतकार, फिल्म उद्योगातील पहिली महिला संगीतकार होती. एक तवायफ ते चित्रपट कलाकार, निर्माती, संगीतकार हा जद्दनबाईचा जीवन प्रवास आकाशाला गवसणी घालण्यासारखाच होता. राजकपूर आपल्या 'आग' या चित्रपटासाठी स्टुडिओ मिळवण्यासाठी जद्दनबाईला भेटायला गेले होते. त्यांनी दरवाजा ठोकला तेव्हा जद्दनबाई घरी नव्हती. तिची मुलगी नर्गिस हिने दरवाजा उघडला. सोळा वर्षाच्या तरूणी नर्गिसला पाहाताच पहिल्या भेटीतच राज कपूर तिच्या प्रेमात पडला.

'आग' चित्रपटाची कास्टींग जवळ जवळ पूर्ण होत आली होती. परंतु नर्गिससाठी राज कपूर यांनी एक भूमिका त्यात परत समाविष्ट केली. या चित्रपटादरम्यान दोघांमध्ये प्रेमसंबध निर्माण झाले. दोघेही एकमेकांच्या खुप जवळ आले. परंतु राज कपूर विवाहीत होता म्हणून दोघांच्याही घरातून या प्रेमाला विरोध झाला. पृथ्वीराज कपूर यांनी खुप प्रयत्न करूनही हे प्रेमसंबध काही थांबायचे नाव घेत नव्हते.

त्यानंतर आलेल्या राजकपूरच्या 'बरसात' या चित्रपटातही ही जोडी खुप गाजली. प्रेक्षकांना ही जोडी खुप आवडली. एकोणीसशे चाळीस ते पन्नासच्या दशकात ही जोडी खुप हिट झाली. अंदाज, बरसात, आह, आवारा, श्री ४२० यासारखे अनेक सुपरहिट चित्रपट या जोडीने दिले.

राज कपूरला बॉलीवूडच्या फिल्म इंडस्ट्रीमध्ये पहिला शोमन मानले जाते. त्याने आपल्या चित्रपट करिअर दरम्यान अनेक हिरोईनबरोबर ऑन स्क्रीन ऑफ स्क्रीन काम केले. अनेक हिरोईन्स ना चित्रपटात लॉन्च केले. चित्रपटाच्या कहाणीपासून लोकेशन आणि हिरो हिरोईन्स निवडण्याचा राज कपूर यांचा हातखंडा लाजवाब होता. परंतु नर्गिससोबत राजकपूर हे नाव खुप अविभाज्य झाले होते. नर्गिस बरोबरची राज कपूर यांची ऑफ स्क्रीन ऑन स्क्रीन बॉण्डिंग जबरदस्त होती.

'बरसात ' चित्रपट बनवित असताना आर्थिक अडचणी आल्यावर नर्गिसने आपल्या हातातल्या सोन्याच्या बांगड्या विकून आर.के.बॅनरला मदत केली होती. बरसातमधील नर्गिस आणि राजकपूर यांचा एक युगल पोठो आर.के.बॅनरचा लोगो म्हणून वापरण्यात आला. पुढच्या काळात नर्गिस राज कपूरच्या आर.के.बॅनरला आर्थिक अडचणीत मदत करीत राहिली. परंतु नर्गिसने राजकपूर सोबत विवाहाचा आग्रह धरला तेव्हा मात्र राज कपूरला ते शक्य झाले नाही. कारण विवाहीत असलेला राज कपूर आपल्या पत्नीला दुखावणे त्याला शक्य नव्हते. परंतु राज कपूरच्या प्रेमात आकंठ बुडालेली नर्गिस मात्र राज कपूरच्या या निर्णयाने विषण्ण झाली. तिने आत्महत्या करण्याचे मन बनविले होते.राज कपूर यांनी 'बॉबी' चित्रपट बनविला तेव्हा त्यात आपली नर्गिस बरोबर पहिली भेट कशी झाली तो प्रसंग त्यात दाखविला आहे. डिंपल आणि ऋषी कपूर यांची 'बॉबी' चित्रपटातील पहिली भेट हिच ती कहाणी आहे. अर्थात चित्रपटाचे कथानक वेगळे व काल्पनिक आहे. फक्त काही प्रसंग तेवढे राज -नर्गिस भेटीची आठवण करून देणारे आहेत.

बॉबी हा अल्लड वयातल्या युगुलांना घेऊन प्रदर्शित होणारा पहिला चित्रपट होता. हा चित्रपट ईतका चालला की 'मेरा नाम जोकर' हा चित्रपट आपटल्याने कर्जबाजारी झालेला राज कपूर पुन्हा सावरला. 'मेरा नाम जोकर' हा राजकपूरच्या संपूर्ण जीवनगाथेवर आधारीत बनलेला चित्रपट होता. 'बॉबी' चित्रपट रिलीज झाला तेव्हा वर्तमानपत्रात आणि चित्रपट मासिकांमध्ये एक अफवा पसरली होती. परंतु त्यात काही तथ्य नव्हते. डिंपल ही नर्गिस आणि राजकपूर यांची नाजायज मुलगी आहे.अशी ती अफवा होती.

कारण असे की 'बॉबी' चित्रपटात डिंपलचा 'लूक' नर्गिसच्या आवारा चित्रपटासारखाचा होता. आणखीन दुसरे कारण या चित्रपटातील डिंपल आणि ऋषी कपूर यांच्या पहिल्या भेटीचा प्रसंग राजकपूर व नर्गिस यांच्या वास्तविक जीवनातला पहिल्या भेटीचे हुबेहूब चित्रण आहे. म्हणूनच मग डिंपल ही राज आणि नर्गिसची नाजायज औलाद असल्याची अफवा उठली.त्यावेळी खुद्द राजकपूर किंवा ऋषी कपूर, डिंपल अथवा नर्गिस यांनी या अफवेला उत्तर दिले नाही. तशी त्यांना गरज वाटली नाही. त्यामुळे ही गोष्ट अजूनही काही लोकांना खरी वाटते.

वास्तविक, डिंपलचे वडील एक प्रथितयश गुजराथी व्यापारी होते. त्यांचा राज कपूर किंवा नर्गिस यांच्याशी दुरान्वे संबंध नाही. नर्गिसचे खरे नाव फातिमा रशीद होते. राज कपूर बरोबर 'चोरी चोरी' हा १९५६ मध्ये आलेला शेवटचा चित्रपट. त्यानंतर दोघेही परत कधी एकत्र आले नाहीत. राजकपूर बरोबर झालेल्या ब्रेकअपनंतर नर्गिस खुप निराश होती. आत्महत्या करण्याच्या मनस्थितीत होती.

वयाच्या अवघ्या अठ्ठावीसाव्या वर्षी 'मदर ईंडीया' या चित्रपटात तिने आईचा रोल केला होता. या चित्रपटाच्या सेटवर भयंकर आग लागली होती. त्या आगीतून सुनिल दत्त या तेव्हा तरूण असणाऱ्या अभिनेत्याने स्वत:चा जीव धोक्यात घालून नर्गिसचे प्राण वाचवले होते.त्यानंतर दोघांचे एकमेकांवर प्रेम जडले. नर्गिस आणि सुनील दत्त यांनी विवाह केला.

या लग्नानंतर प्रिया दत्त, नम्रता व संजय दत्त यांचा जन्म झाल्यावर नर्गिसने एका मुलाखतीत खुलासा केला होता. डिंपल हि आपली नाजायज मुलगी नाही. ती केवळ अफवा पसरवली गेली होती. सुनील दत्त याच्याशी लग्न झाल्यावर नर्गिसने चित्रपटात काम करणे बंद केले होते. सुनील दत्त यांच्या पडत्या काळात नर्गिसने आपला संसार नेकीने केला. एक वेळ असा आला होता सुनील दत्त यांचे चित्रपट आपटत होते तेव्हा नर्गिसला घरखर्च चालवणे अवघड झाले होते. परंतु नर्गिसने त्याचा बाऊकेला नाही. संजय दत्त दिल्ली येथे बोर्डिंग स्कूलमध्ये शिकत असताना मुंबई ते दिल्ली नर्गिस यांना नियमित जावे लागे. कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराने ग्रस्त असतानाही नर्गिस मुलासाठी दिल्लीत जात असे. अखेरीस १९८१ साली नर्गिस यांचे कॅन्सरने निधन झाले. ●●

## मकरंद अनासपूरे, भूषण प्रधान, प्रार्थना बेहेरे आणि सयाजी शिंदे यांचा 'रंगीत' अल्ट्रा झकास ओटीटीवर!

**राम कोंडीलकर**

आयुष्य जेव्हा रंगीत असतं, तेव्हा प्रेमात आलेला विरह म्हणजे अपघाताने कॅनवासवर पडलेला काळा रंग. अशा या विरहामागे एक रहस्यमय घटना असेल तर? एक रहस्यमय आणि रंगहीन घटना 'रंगीत'या चित्रपटात दडून बसली आहे, जी प्रेक्षकांच्या अंगावर काटा आणणारी आहे. 'रंगीत' दिनांक १७ मे २०२४ रोजी थेट 'अल्ट्रा झकास' या मराठी ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. प्रेक्षकांना आजवर न मिळालेल्या एका थरारक चित्रपटाचा मनमुराद आस्वाद घेता येणार आहे.



चित्रपटाची कथा एका फाईन आर्ट्स महाविद्यालयाच्या आवारात फिरते. विरहाच्या नैराश्येमुळे कायम नशेत असणारा सिद्धार्थ महाविद्यालयच्या आवारात फिरत आहे. महाविद्यालयात नव्यानेच प्रवेश घेतलेल्या शिवाला आवारात एका स्त्रीच्या आत्म्याचा भास होत आहे. आत्म्याचा आणि सिद्धार्थच्या प्रियसीचा चेहरा एकच असल्याचं लक्षात येतं. पण त्याला अचानक सोडून गेलेली प्रियसी मरण पावली कशी याचा शोध सुरू होतो. तिच्या मरणाचं कारण भयंकर असून त्यामागील रहस्यमय कथा प्रेक्षकांना चित्रपटात पहायला मिळणार आहे.

चित्रपटाचे दिग्दर्शन प्रज्योत दिवाकरराव कडू यांनी केले असून मकरंद अनासपूरे, सयाजी शिंदे, भूषण प्रधान आणि प्रार्थना बेहेरे या स्टार अभिनेत्यांनी चित्रपटात आपल्या अनोख्या भूमिका साकार केल्या आहेत.

''मराठी मातीतल्या चित्रपटांमध्ये अनेकानेक प्रयोग व्हावेत असं नेहमी वाटतं. अशाच एका प्रयोगातून जन्मलेला हा 'रंगीत' चित्रपट प्रेक्षकांना नक्कीच मनोरंजनाच्या शिखरावर पोहचवेल याची शास्वती वाटते. म्हणून 'रंगीत' सारखा चित्रपट थेट अल्ट्रा झकास ओटीटीवर प्रदर्शित करत आहोत.'' असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रा. लिमिटेडचे सी.ई.ओ. श्री. सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले.



## अशोक सराफ, रोहिणी हट्टंगडींना नाट्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार







**शरद कोरडे**

अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेच्या वतीने दरवर्षी नाट्यक्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्या रंगकर्मींना दरवर्षी १४ जून रोजी गो.ब. देवल यांच्या स्मृतीदिनी पुरस्कार देण्यात येतात. यंदाच्या सोहळ्यात ज्येष्ठ चित्रपट व नाट्य अभिनेते अशोक सराफ व रोहिणी हट्टंगडी यांना नाट्यपरिषदेचे जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाले आहेत. गेली तीन वर्षे या पुरस्कारांचे वितरण झाले नव्हते, तथापि नाट्य परिषदेची निवडणूक पार पाडल्यानंतर नवनिर्वाचित नियामक मंडळाने हे पुरस्कार वितरण करण्याचा निर्णय घेतला व १४ जून रोजी सायंकाळी ४.०० वाजता यशवंत नाट्यमंदिरात या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने कलावंतांचा मेळावाही आयोजित करण्यात आला आहे.

जीवनगौरव पुरस्कारासाठी निवड झालेले अशोक सराफ व रोहिणी हट्टंगडी हे दोन्हीही ज्येष्ठ कलाकार गेली पाच दशके मराठी रंगभूमीवर कार्यरत असून मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतही त्यांनी मोलाचे कार्य केले आहे. त्यांची निवड करून नाट्य परिषदेने त्यांच्या नाट्यसेवेचा व रंगभूमीवरील योगदानाचा सन्मान केला आहे.

अशोक सराफ यांना याचवर्षी महाराष्ट्र शासनाचा 'महाराष्ट्र भूषण' हा प्रतिष्ठेचा नागरी पुरस्कार प्राप्त झाला असून त्यानंतर याच वर्षी त्यांना मा. दिनानाथ मंगेशकर पुरस्कारानेही गौरविण्यात आले होते. त्यातच नाट्य परिषदेने त्यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर करून त्यांच्या जीरेटोपात मोलाचा तुरा खोवला आहे. उत्कृष्ट अभिनय, सहज विनोदप्रवृत्ती, चेहऱ्यावरील बदलणारे भाव, अचूक वेळ ही त्यांच्या अभिनयाची खासियत आहे. मुळचे बेळगावचे असलेल्या अशोक सराफ यांचा जन्म मुंबईत ४ जून १९४७ साली झाला. मुंबईतील चिखलवाडीत त्याचे बालपण गेले. संगीत रंगभूमीवरील गायक नट गोपीनाथ सावकार हे त्यांचे सख्खे मामा. त्यांच्या नाटक कंपनीत अकराव्यावर्षी त्यांनी वि.वा. शिरवाडकर यांना 'ययाति देवयानी' या नाटकात विदूषकाची भूमिका केली व रंगभूमीवर प्रवेश केला. गजानन जहागीरदार यांच्या 'दोन्ही घरचा पाहुणा' या चित्रपटात त्यांनी प्रथम विनोदी भूमिका केली. त्यानंतर रमेश देव यांच्या 'जानकी' या चित्रपटात त्यांनी महत्त्वाची भूमिका केली. दूरदर्शनवरील हिंदी मालिका 'हम पाँच' मध्ये त्यांनी चार मुलींच्या बापाची महत्त्वाची भूमिका केली. या मालिकेमुळे त्यांना भारतभर प्रसिद्धी मिळाली. अमेरिकेतील सिएटल नाट्यगृहात झालेल्या महोत्सवात त्यांनी विजय केंकरे दिग्दर्शित 'हे राम कार्डीओग्राम' हे नाटक त्यांनी बृहन्महाराष्ट्र कन्वेक्शनसाठी केले. या नाटकाने त्यांना परदेशी रंगभूमीवर काम करण्याची संधी मिळाली. सचिन पिळगावकर यांच्या प्रत्येक चित्रपटात त्यांची भूमिका असायची. अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे व सचिन यांनी अनेक चित्रपटांत एकत्र काम करून धमाल उडवून दिली. निर्माते व अभिनेते महेश कोठारे यांच्या चित्रपटातून त्यांनी लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासमवेत विनोदी भूमिका केल्या. अशोक सराफ यांचे 'गोंधळात गोंधळ', 'धुमधडाका', 'गंमत जंमत', 'आयत्या घरात घरोबा', 'अशी ही बनवाबनवी', 'एक उनाड दिवस', 'एकापेक्षा एक', 'नवरा माझा नवसाचा', 'गुपचूप गुपचूप', 'एक डाव भूताचा', 'एक डाव धोबीपछाड' आदी गाजलेल्या चित्रपटांतून कामे केली. अनेक हिंदी चित्रपटातूनही त्यांनी विविध प्रकारच्या बहारदार भूमिका केल्या. लक्ष्मीकांत बेर्डे, सुधीर जोशी, सचिन, महेश कोठारे हे त्यांचे जवळचे मित्र होते. सुप्रसिद्ध अभिनेत्री रंजना देशमुख यांच्यासोबत त्यांची विशेष जोडी जमली होती. दोघांच्या विनोदी भूमिका पाहणे हा मराठी रसिकांचा आनंदाचा ठेवा होता. आज वयाच्या ७७ व्या वर्षीही तितक्याच उत्साहाने व क्षमतेने नाट्य चित्रपटात ते काम करीत आहेत. त्यांची 'हमीदाबाईची कोठी', 'अनाधिकृत', 'मनोमिलन', 'डार्लिंग डार्लिंग', 'सारखं छातीत दुखते', 'लगीनघाई', 'व्हॅक्युम क्लिनर' आदी नाटके खूप गाजली.

रोहिणी ओक उर्फ रोहिणी हट्टंगडी यांचा जन्म ११ एप्रिल १९५१ साली पुण्यात झाला. मराठी, हिंदी, गुजराथी रंगभूमीवर त्यांनी कामे केली. पुण्यातील रेणुका स्वरूप मेमोरियल गर्ल्स हायस्कूलमधून त्यांनी शिक्षण घेतले. त्यांना नाटकाची आवड असल्याने त्यांना चित्रपटात जायचे नव्हते. त्यांचे वडील अनंत ओक यांनी त्यांना अभिनय शिकायचे असेल तर ते नाटकातून शिकता येते असे त्यांच्या मनावर ठसविले होते. त्यामुळे रोहिणी ओक यांनी वडिलांच्या आग्रहानुसार दिल्लीच्या राष्ट्रीय नाट्यविद्यालयात (एस.एन.डी.टी.) प्रवेश घेतला. त्यावेळी पुण्यात प्रभातच्या जागेवर नॅशनल फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ही संस्था होती. त्यात न जाता त्यांनी एस.एन.डी. टी. मध्ये प्रवेश घेतला. इब्राहिम अल्काझी हे त्यांचे गुरू होते. त्यांचे सहअध्यायी जयदेव हट्टंगडी होते. ज्यांच्यासोबत त्यांचा १९७७ मध्ये विवाह झाला. प्रो. सुरेंद्र वडगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आठ वर्षे शास्त्रीय नृत्य, कथकली व भरतनाट्यमचे प्रशिक्षण घेतले. १९७८ मध्ये त्यांनी प्रथम अरविंद देसाई यांच्या 'अजीब दास्ता' या चित्रपटातून भूमिका केली. त्यानंतर 'पार्टी' 'सारांश' आदी चित्रपटातून भूमिका केल्या. त्यानंतर रोहिणी हट्टंगडी यांनी 'अल्बर्ट पिंटो को गुस्सा क्यू आता है (१९८०)', 'चक्र' १९८१, 'गांधी' १९८१, 'भावना' १९८१, 'दल' १९८४ (सर्वश्रेष्ठ सहाय्यक भूमिकेचा राष्ट्रीय पुरस्कार), 'मोहन जोशी हाजीर हो' १९८४, 'प्रतिघात' १९८७, 'शहेनशहा' १९८७, 'हिरो हिरालाल' १९८८, 'बिलू बादशहा' १९८८, 'चालबाज' १९८९, 'अग्निपथ' १९९०, (सर्वश्रेष्ठ सहाय्यक भूमिकेचा फिल्मफेअर पुरस्कार), 'दामिनी' १९९३, 'मुन्नाभाई एमबीबीएस' २००३, 'किसीका भाई किसीकी जान' २०२३ आदी चित्रपटांतून कामे केली.

रोहिणी हट्टंगडी यांनी व्यावसायिक रंगभूमीवर केलेले पहिले नाटक हे 'कस्तुरीमृग' होते. वसंत कानेटकरांनी गोव्यातील गायिका हिराबाई पेडणेकर यांच्या आयुष्यावर आधारीत या नाटकात त्यांनी नायिकेचे काम केले होते. या नाटकाचे आणखी एक वैशिष्ट्य होते. या नाटकात नायिकेच्या आयुष्यात आलेल्या चारही पुरूषांची कामे डॉ. श्रीराम लागू यांनी केली होती. या नाटकात नायिकेवर प्रेम करणारा पण ते व्यक्त न करणाऱ्या तरूणाचे काम मोहन गोखले यांनी केले होते. त्यानंतर रोहिणी हट्टंगडी यांनी 'उद्ध्वस्त धर्मशाळा', 'एकच प्याला', 'असा मी काय गुन्हा केला', 'कथा कुणाची व्यथा कुणा', 'कळी एकदा फुलली होती', 'खंडोबाचं लगीन', 'चांगुणा', 'डंख', 'तीन चोक तेरा', 'दिल्या घरी तू सुखी रहा', 'दिवा जळू दे सारी रात', 'मित्राची गोष्ट', 'रथचक्र', 'लपंडाव', 'शांतता, कोर्ट चालू आहे', 'शितू', 'आम्ही जगतो बेफाम', 'श्रीमंत' आदी नाटकांतून कामे केली. शिवाय 'बोल बोल म्हणता', व 'भ्रमाचा भोपळा' या नाटकांतून मुख्य भूमिकाही केल्या. मराठी सोबत गुजराथी नाटकांतूनही त्यांनी भूमिका केल्या. 'नोकराणी', 'सर्पनाद', 'लोहमत', 'माणस होबानो माने डंख', 'जुगलबंदी', 'अमे जीवीये बेफाम' या गुजराथी नाटकांतून त्यांनी कामे केली. रिचर्ड अँटनेबॅसेच्या 'गांधी' या सिनेमांतील कस्तुरबाच्या त्यांच्या भूमिकेत सर्वश्रेष्ठ सहनायिकेचा पुरस्कार मिळाला. असा पुरस्कार मिळविणाऱ्या त्या पहिल्या भारतीय आहेत. अशा ज्येष्ठ कलावंतांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्याचा मान नाट्यपरिषदेने घेतला आहे.

१४ जूनच्या गो.ब. देवल स्मृती पुरस्कारात शाहीर साबळे, नाट्यनिर्माते सुधीर भट, स्मिता तळवळकर व आनंद अभ्यंकर या कलाकारांच्या स्मृतीप्रित्यर्थ नाट्यपरिषदेतर्फे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. गो.ब. देवल स्मृती पुरस्काराने 'नियम व अटी लागू', 'डबल लाईफ', 'आय एम शारूकथा आगीमहूल' व 'जय जय गौरीशंकर' या नाटकांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे सर्वोत्कृष्ट अभिनेता संकर्षण कऱ्हाडे (नियम व अटी लागू), सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेता मयुरेश पेम (ऑल दि बेस्ट २) सहाय्यक अभिनेता आशुतोष गोखले सर्वोत्कृष्ट अभिनेत्री लिना भागवत (इवलेसे रोप), विनोदी अभिनेत्री शलाका पवार, सहाय्यक अभिनेत्री पर्ण पेढे (चारचौघी), सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी (नियम व अटी लागू), नेपथ्य संदेश बेंद्रे (२०७ पद्मिनी घाग), प्रकाशयोजना अमोघ फडके (जर तरची गोष्ट), पार्श्वसंगीत सौरभ भालेराव (आजीबाई जोरात), रंगभूषाकार उल्लेख खंदारे (कुर्रर) आदींना नाट्यपरिषदेतर्फे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहेत. ●●

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)